
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२८१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि.५ डिसेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६





## संपादकीय ......

# देवाभाऊ होणार तिसऱ्यांदा मुख्यमंत्री

*महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची माळ अखेरीस गुरुवारी, ५ डिसेंबरला देवेंद्र फडणवीसांच्या गळ्यात पडणार आहे. देशाला उत्सुकता लाजून राहिलेल्या महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदासाठी बुधवारी देवेंद्र फडणवीस यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले. भाजपाच्या विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत देवेंद्र फडणवीस यांची विधिमंडळ गटनेतेपदी एकमताने निवड केली. या सर्व निवड प्रक्रियेनंतर आता देवेंद्र फडणवीस हेच राज्याचे नवे मुख्यमंत्री होणार, हे आता स्पष्ट झाले आहे. महाराष्ट्रातील २८८ विधानसभा मतदारसंघांपैकी तब्बल २३० जागांचे दान महाराष्ट्रातील जनतेने भरभरून महायुतीच्या पारड्यात टाकले आहे. शहरी भागातील सुशिक्षित मतदारांनी पंतप्रधान मोदी यांना पाहूनच भाजपाला मतदान केले असले तरी ग्रामीण भागात भाजपाकडून मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस हेच विराजमान होणार हे गृहीत धरूनच भाजपाला मतदान झाले आहे, हे नाकारता येणार नाही. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या वादळी यशामुळे महाविकास आघाडीचा अक्षरशः पालापाचोळा उडाला. महाविकास आघाडीला सभागृहात विरोधी पक्षनेतेपदही मिळणार नाही. महायुतीच्या यशामध्ये महिला मतदारांचा सिंहाचा वाटा आहे. महिला मतदारांमध्ये फडणवीस यांची 'लाडक्या बहिणींचा देवाभाऊ' अशीच प्रतिमा आहे. देवेंद्र फडणवीस यांची भाजपाच्या विधिमंडळ गटनेतेपदी निवड होताच महायुतीच्या तिन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये, पदाधिकाऱ्यांमध्ये आनंदाचे उधाण आले असून शहरी व ग्रामीण भागात जल्लोष साजरा केला जात आहे. देवाभाऊंची जनसामान्यामध्ये सोज्वळ प्रतिमा असली तरी राज्यकारभारात ते 'खमक्या' स्वभावाचे म्हणून ओळखले जात आहेत. चुकीच्या गोष्टीची पाठराखण न करणे, अयोग्य गोष्टींचे समर्थन न करणे, गुन्हेगारांना वठणीवर आणणे अशा स्वरूपाची त्यांची कामगिरी गृहमंत्री म्हणून, मुख्यमंत्री म्हणून मंत्रालयातील प्रशासकीय सनदी अधिकाऱ्यांनी जवळून पाहिली आहे, अनुभवली आहे. देवेंद्र फडणवीस गुरुवारी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची तिसऱ्यांदा शपथ घेतील. शरद पवारांपाठोपाठ सर्वाधिक वेळा म्हणजेच तीन वेळा मुख्यमंत्रीपद मिळविण्याच्या विक्रमाची देवेंद्र फडणवीस यांनी बरोबरी केली आहे. सध्याची त्यांची वाटचाल व महाराष्ट्रीय जनतेचा त्यांना असलेला पाठिंबा पाहता ते शरद पवारांचाही मुख्यमंत्रीपदाचा विक्रम मोडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. २०१४ ते २०१९ या पाच वर्षाच्या कालावीति सलगपणे पाच वर्षे देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून काम केले आहे. शरद पवार हे जरी महाराष्ट्राचे चार वेळा मुख्यमंत्री झाले असले तरी त्यांना सलग पाच वर्षे एकदाही महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद भूषविता आलेले नाही. जसे देवाभाऊंनी सलग पाच वर्षे मुख्यमंत्रीपद भूषविण्याचा विक्रम केला, तसाच महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाचा कारभार अवघ्या ८० तासांकरिता सांभाळण्याचा विक्रमही देवाभाऊंच्या खात्यात जमा आहे. २०१९ मध्ये विधानसभा निवडणुकीनंतर मुख्यमंत्रीपदावरून शिवसेनेशी वाद झाल्यावर अजित पवार व त्यांच्या समर्थक आमदारांच्या पाठिंब्यावर देवाभाऊंनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली होती. पण हे सरकार अवघे ८० तासच टिकले. देवेंद्र फडणवीस यांचीच महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदासाठी निवड होणार, याची जनतेलाही ठाम खात्री होती. आज फक्त त्या खात्रीवर, विश्वासावर, दाव्यावर शिक्कामोर्तब झाले आहे.*

*देवेंद्र फडणवीस यांना सभागृहात राज्याचा कारभार हाकताना विरोधकांचे संख्याबळ अत्यल्प असल्याने फारशा अडचणी येणार नाहीत. तथापि मुख्यमंत्रीपदाची काटेरी खुर्ची सांभाळतांना त्यांना महायुतीमधील शिवसेना व राष्ट्रवादी या दोन्ही पक्षांची मर्जी सांभाळावी लागणार आहे. राज्यकारभार हाकताना निर्णय घेण्यापूर्वी महायुतीमधील मित्र दुखावले जाणार नाही, याची काळजी घ्यावी लागणार आहे. अर्थात देवाभाऊ १९९९ पासून विधानसभेत सक्रिय असल्याने व त्यांची प्रतिमा अभ्यासू प्रशासक असल्याने त्यांना फारशा अडचणी येणार नाहीत. नगरसेवक ते मुख्यमंत्री अशी देवाभाऊंची वाटचाल असल्याने त्यांना सर्वसामन्य कार्यकर्ता ते विधान भवन यांचा अनुभव आहे. देवाभाऊंच्या मुख्यमंत्रीपदाच्याशपथविधी कार्यक्रमाला उपस्थित राहणे महायुतीच्या पदाधिकाऱ्यांना व कार्यकर्त्यांना शक्य नसले तरी दूरचित्रवाणीच्या माध्यमातून ते हा सोहळा पाहण्याची शक्यता आहे. देवाभाऊंच्या शपथविधीनंतर महाराष्ट्र राज्याच्या तिजोरीचाही त्यांना कानोसा घ्यावा लागणार आहे. सरकारने लोकसभा निवडणुकीनंतर अनेक जनकल्याणकारी योजनांचा शुभारंभ केला आहे. त्या योजना सुरू ठेवण्याचे अग्निदिव्य देवाभाऊंना पेलावे लागणार आहे. 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजनेमुळे राज्याच्या अर्थकारणावर 'बोजा' आला असल्याचे बोलले जात आहे. लाडक्या बहिणींना दर महिन्याला १,५०० रुपयांची भेट दिल्याने मतदान वाढल्याचे बोलले जात असल्याने ही योजना सुरू ठेवण्याची किमया देवेंद्र फडणवीस यांना साध्य करून दाखवावी लागणार आहे. ही योजना बंद पडल्यास अथवा ज्या महिलांना योजनेचा लाभ मिळाला आहे, त्या लाभधारकांची छाननीमध्ये कपात झाल्यास महिला वर्गाचामोठ्या प्रमाणावर रोष पत्करावा लागण्याची भीती आहे. याशिवाय फडणवीस मुख्यमंत्रीपदी विराजमान होताच मराठा आरक्षणाबाबत सातत्याने आंदोलन करणारे मनोज जरांगे- पाटील पुन्हा मैदानात उतरण्याची शक्यता आहे. त्यातून मराठा व ओबीसी वादाचा कलगीतुरा रंगण्याची शक्यात आहे व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. लाडक्या वहीण योजनेसाठी निधीची उपलब्धता आणि मराठा-ओवीसी वाद या अडचणींची सलामी झडण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्रीपद स्वीकारल्यावर सामना कराव्या लागणाऱ्या संभाव्य अडचणींची कल्पना देवाभाऊंना असणार. गुरुवारी देवाभाऊ मुख्यमंत्री म्हणून शपथ घेत असताना राज्यातील प्रत्येक जिल्ह्यांमध्ये भाजपाकडून फटाके फोडून जल्लोष साजरा केला जाईल, महाराष्ट्रामध्ये महायुतीला मिळालेले भरघोस यश व भाजपाचे प्रथमच इतक्या संख्येने निवडून आलेले आमदार ही देवेंद्र फडणवीसांच्या कार्याची पोहोचपावती आहे. भाजपाने देवेंद्र फडणवीसांकडे मुख्यमंत्रीपद सोपविताना त्यांच्या परिश्रमाची पोहोचपावती दिलेली आहे. सभागृहाबाहेर व सभागृहात कितीही अडचणी निर्माण झाल्या तरी त्या अडचणीचा निवारण करण्यास देवेंद्र फड़णवीस सक्षम आहेत. त्यांना महाराष्ट्राचा कारभार हाकताना महायुतीचाही कारभार सांभाळायचा आहे.आणि हा कारभार ते उत्तम सांभाळणार यात तीळमात्र ही शंका नाही.*

# सुसंस्कृत पिढीसाठी वाचन संस्कृती महत्त्वाची

टीव्ही आणि समाजमाध्यमांच्या वाढत्या प्रभावापुढे दिवसेंदिवस वाचन कमी होत आहे. विद्यार्थी व तरुणांमध्ये वाचनाची गोडी वाढावी, वाचनाची सवय लागावी म्हणून राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने वाचन महोत्सवासारखे उपक्रम सुरू केले. या उपक्रमात राज्यभरातून ऐंशी लाखांपेक्षा जास्त विद्यार्थी सहभागी झाले असले तरी मुंबई, ठाणे, पुणे अशा महानगरात वाचन महोत्सवात सहभागी होणाऱ्या मुलांची टक्केवारी तुलनेने खूपच कमी असल्याची माहिती पुढे आली आहे. मुंबई, ठाणे, पुणे हा राज्यातील प्रगत पट्टा आहे. सर्वाधिक विकास या भागात आहे. सर्वाधिक सोयीसुविधा याच पट्ट्यात आहेत. सर्वाधिक दर्जेदार शिक्षणसंस्था, पायाभूत सेवा, सर्वाधिक गुंतवणूक व सर्वाधिक रोजगार या टापूत आहे. मग या भागात विद्यार्थ्यांना वाचनात फारसा रस का नसावा? केवळ व्हॉट्सॲप, यूट्यूब, फेसबुक, इंस्टाग्राम म्हणजे सर्व जग आहे व सोशल मीडिया म्हणजे जागतिक ज्ञानाचे भांडार आहे, अशा समजुतीत युवा पिढी असेल तर ती चुकीच्या मार्गावर जात आहे.

शिक्षक, पालक आणि समाजिक संस्थांनी वेळीच या प्रश्नाचे गांभीर्य ओळखून विद्यार्थीदशेत वाचनाची सवय कशी लागेल, वाचनाची गोडी कशी वाढेल यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. विद्यार्थी वर्गात वाचनाची गोडी वाढावी यासाठी पालक, शिक्षकांनी व समाजातील घटकांनी जाणीवपूर्वक उपक्रम राबवले पाहिजेत. माध्यमांनीही म्हणजेच वृत्तपत्रांनीही अशा मोहिमेत सक्रिय सहभागी झाले पाहिजे. कोविड काळापासून राज्यात वृत्तपत्रांचे खप घसरले. कोविड काळ संपल्यावरही घरोघरी रोज सकाळी जाणाऱ्या पत्रांवरही परिणाम झाला. वृत्तपत्रे हवीत कशाला, जे वाचायचे ते सोशल मीडियावर सहज मिळते, अशी मानसिकता बळावली. अनेकजण क्रीडा, मनोरंजन, अध्यात्म, करिअर, विज्ञान, तंत्रज्ञान असे आवडीचे विषय सोशल मीडियावर शोधू लागले व त्यातच ते मश्गूल झाले. वृत्तपत्रे, मासिके, साप्ताहिके यांचे वाचन कमी झाले तसेच पुस्तकांचे वाचन तर त्याहीपेक्षा कमी झाले. केवळ अभ्यासाची




पुस्तके वाचायची म्हणजे वाचन नव्हे. विविध विषयांवरील पुस्तकांचे वाचन झाले पाहिजे. वाचन संस्कृती वाढली पाहिजे, वाचनाची सवय लागली पाहिजे. विशेष म्हणजे शालेय जीवनातच वाचनाची गोडी लागली पाहिजे. शालेय शिक्षण विभागाने महावाचन उपक्रम सुरू केला तो स्वागतार्ह आहे. पण या उपक्रमात जास्तीत जास्त नव्हे तर सर्व विद्यार्थ्यांनी सहभागी झाले पाहिजे, अशी तयारी झाली पाहिजे. मुंबईमध्ये सर्व सोयी, सेवा उपलब्ध आहेत, तरीही मुंबईच्या उपनगरातील अकरा लाख विद्यार्थ्यांपैकी केवळ साडेतीन लाख सहभागी होतात हे मुंबईला मुळीच भूषणावह नाही. राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये मुंबई उपनगर जिल्हा महावाचन उपक्रमात ३०व्या क्रमांकावर आहे, हे लांच्छनास्पद आहे. मुंबई लगत असलेला ठाणे जिल्हाही महावाचन उपक्रमात २४ व्या क्रमांकावर आहे, या जिल्ह्यातील तेरा लाख विद्यार्थ्यांपैकी पाच लाखसुद्धा या उपक्रमात सामील झाले नव्हते. मुंबई शहराने मात्र पहिल्या पाच जिल्ह्यांमध्ये चौथा क्रमांक मिळवला आहे ही समाधानाची बाब आहे.

मुंबई शहरातील ७६ टक्के मुलांनी वाचन उपक्रमात भाग घेतला, अर्थात त्यावर आपण खूप काही साध्य केले असे न मानता ही टक्केवारी शतप्रतिशत कशी होईल याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. महावाचन उपक्रमात राज्यातील एक लाखाहून अधिक शाळांनी सहभाग घेतला ही आनंदाची बाब असली तरी सर्व शाळा व सर्व विद्यार्थी वाचनाकडे आकर्षित होतील यासाठी सामाजिक खासगी संस्थांना बरोबर घेऊन शाळांनी प्रयत्न केले पाहिजेत. मराठवाड्यातील बीड जिल्ह्याने महावाचन उपक्रमात पहिला क्रमांक पटकावला आहे ही कौतुकाची बाब आहे, पण पुणे जिल्ह्याने शेवटचा क्रमांक मिळवला याला काय म्हणावे? राज्यात या वर्षी लोकसभा व विधानसभा अशा दोन मोठ्या निवडणुका झाल्या. निवडणुकीच्या व राजकीय रणधुमाळीच्या धामधुमीत ठाणे जिल्ह्यातील कल्याण येथे अखंड वाचन यज्ञ उपक्रम पार पडला. मुलांमध्ये वाचनाची गोडी लागावी म्हणून अक्षरमंच, फ्रेंडस लायब्ररी किंवा राज्ञीसारख्या असंख्य समाजसेवी संस्था वर्षभर वेगवेगळे उपक्रम मुंबई परिसरात राबवत असतात. वाचनाची गोडी वाढावी म्हणून वाचन यज्ञ केवळ ठाणे, कल्याण-डोंबिवली पुरते मर्यादित असता कामा नये. मुंबईच्या उपनगरात तसेच राज्यात जिल्हा व तालुका पातळीवरील अखंड वाचन यज्ञ योजले पाहिजेत. कल्याण येथे अखंड वाचन यज्ञ ५० तास चालला, एकत्रित २०० तास वाचन झाले. जयवंत दळवी वाचन नगरी, वीणा देव किंवा सुधा करमरकर वाचन कट्टा अशा नामवंत लेखकांच्या नावाने उभारलेल्या मंचावर हे वाचन यज्ञ पार पडले. या वाचन यज्ञात १८ सामाजिक संस्था व २ शाळांनी भाग घेतला हे कौतुकास्पद आहे. विशेष म्हणजे भिवंडीच्या कर्णबधिर विद्यालयातील विद्यार्थ्यांचा सहभाग अभिनंदनीय आहेच पण इतरांनाही त्यापासून स्फूर्ती मिळावी. शाळा-कॉलेजमधील तरुण मुले राजकीय नेत्यांच्या मागे धावताना दिसतात. त्यांच्या मिरवणुका, त्यांचे मोर्चे, त्यांच्यासाठी झिंदाबाद, मुर्दाबादच्या घोषणा, गुलाल उधळणे, गाण्यांवर नाचणे, यात हजारो मुलांचे करिअर कोणत्या दिशने जाते, याचा विचार करायला कुणाला वेळ नसतो. राजकीय नेत्यांना त्यांच्या पुढे-मागे नाचणारी व घोषणा देणारी तरुणांची फौज पाहिजेच असते. तरीही पालक, शिक्षक व सामाजिक संस्थानी सुसंस्कारीत व सुसंस्कृत पिढी घडविण्यासाठी वाचन संस्कृती कशी वाढेल यासाठी प्रयत्न चालू ठेवले पाहिजेत.

# रब्बी हंगामात जमिनीत ओलावा टिकवण्यासाठी 'हे' कराच?

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक**

खरीप हंगामात किंवा सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये पडलेल्या उशिराच्या पावसाच्या ओलीवर साधारणतः कोरडवाहू पिकांची वाढ होत असते. त्यामुळे रब्बी हंगामात जास्तीत जास्त कालावधीपर्यंत जमिनीत ओलावा टिकविणे पीक उत्पादनाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते. किमान पिकाची फुलोरा आणि पुढे दाणे भरण्याच्या अवस्थेत जमिनीत ओलावा असणे अत्यंत गरजेचे असते.




जमिनीतील ओलावा टिकून ठेवण्यासाठी उभ्या पिकात कोळपणी आणि जमिनीच्या पृष्ठभागावरून होणारे पाण्याचे बाष्पीभवन थांबवण्यासाठी तसेच तणांची वाढ होऊ न देण्यासाठी आच्छादनाचा वापर करणे या दोन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. ओलावा टिकवून ठेवण्यासाठी उभ्या पिकात कोळपणी केल्याने तणांचे नियंत्रण तर होतेच, त्याचप्रमाणे पिकाला मातीची भर लागते.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

तसेच भारी जमिनीला मोठ्या प्रमाणात पडणाऱ्या भेगा बुजवण्यासही मदत होते. असे म्हटले जाते की जमिनीत दोन कोळपण्या केल्या की, त्या जमिनीत घेतलेल्या पिकाला एक पाणी दिले असे समजायला हरकत नाही.

**कोळपण्या करण्याची शिफारस**- रब्बी हंगामात ज्वारी पिकास एकूण तीन कोळपण्या करण्याची शिफारस आहे. पहिली कोळपणी पीक लागवडीनंतर तीन आठवड्याने केल्याने जमिनीत वाढणाऱ्या तणांचे नियंत्रण होते. पाच आठवड्यानंतर जमिनीतील ओल कमी होऊन भेगा पडू लागतात. अशावेळी कोळपणी केल्याने भेगा बुडण्यास मदत होते. तिसरी कोळपणी आठ आठवड्यानंतर दातेरी कोळप्यानी करावी ज्यामुळे ओल टिकवून ठेवण्यास मदत होते.

आच्छादनाचा वापर करून जमिनीच्या पृष्ठभागावरून होणारे पाण्याचे बाष्पीभवन थांबवणे, तणांचा बंदोबस्त करणे तसेच तणांची वाढ न होऊ देण्यासाठी आच्छादनाचा वापर करून जमिनीत ओलावा टिकवता येतो. वाळलेले गवत, तूरकाड्या, धसकटे, गव्हाचे काड, उसाचे पाचट हे शेतातील पदार्थ अच्छादनासाठी पीक ६ आठवड्यांचे होईपर्यंत हेक्टरी ५ टन या प्रमाणात आच्छादनाचा वापर करावा.अच्छादनाच्या वापराने सुमारे २५ ते ३० मि.मी. ओलावा उडून जाण्यापासून थांबवला जातो. याचाच अर्थ असा की साधारणपणे २५ ते ३० मि.मी. ओलावा पिकाला उपलब्ध होतो. केओलीन किंवा ८ टक्के खडूची पावडर पिकावर फवारल्याने पिकांच्या पानातून होणारे बाष्पनिष्कासन कमी करता येते.

**- डॉ. कल्याण देवळाणकर**, सेवानिवृत्त शास्त्रज्ञ, कृषी विद्यापीठ




# जवसाचे फायदे आणि त्याचे औषधी गुण

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक** - तुम्हाला हिवाळ्यात केले जाणारे जवस/अळशीचे लाडू लक्षात आहेत का ? तेच लाडू जे आपली आजी, आत्या घरी बनवत असत. अळशीचे लाडू शरीराला गरम ठेवतात, असे माझी आजी म्हणायची. हे लाडू खाण्यास अत्यंत स्वादिष्ट असतात. त्याचबरोबर जेव्हा आजीला गुडघ्याचा त्रास जाणवत त्यावेळी ती जवस/अळशीचे तेल लावत असत. त्यावेळी मला जवसाचे फायदे काय आहेत, याची माहिती नव्हती. पण आता मला माहीत आहे की, जवस किंवा अळशी का खायला हवे ? थोड्यावेळात तुम्हालाही याबाबत सर्व माहिती होईल.



जवसमध्ये मुख्यतः दोन पौष्टिक तत्त्व आढळून येतात. पहिले ओमेगा-३ एस आणि लिग्नांस

फक्त एक चमचा जवसाच्या पावडरने शरीराला १.८ ग्रॅम ओमेगा-३ एस मिळते. इतक्याच प्रमाणात आपल्याला कोणत्याही आहारातून ७५ ते ८०० पट जास्त लिग्नांस मिळते. जवसात फायबरही आढळून येतेओमेगा-३ एस यामुळे आपल्याला वेदनेतून दिलासा मिळतो आणि हृद्य हेल्दी राहते. तर लिग्नांस आपल्याला कॅन्सरविरोधात लढण्यास मदत करते. तर फायबर पचनक्रिया ठिक ठेवते.

**१. प्रोस्टेट कॅन्सरपासून वाचवतो जवस-** अभ्यासात असे आढळून आले आहे की, जवस पुरुषांना होणारे प्रोस्टेट कॅन्सर वाचवण्यास मदत करते. जवस/अळशीत असलेल्या लिग्नांसमुळे कॅन्सरचा ट्यूमर कमी होताना दिसला आहे. तर अमेरिकेतील स्लोन कॅटरिंग कॅन्सर सेंटर इन्स्टिटयूटच्या अहवालानुसार, जवस महिलांसाठीही फायदेशीर आहे.या अहवालानुसार, महिलांमध्ये मेनोपॉजनंतर आहारात जवस/अळशीचा समावेश केल्याने ब्रेस्ट कॅन्सरचा धोका कमी होतो. तर रोज जवस खाल्ल्याने ब्रेस्ट कॅन्सरमध्ये ट्यूमरचा आकारही कमी होतो.

**२. डायबिटीजमध्येही जवसाचे फायदे**

अमेरिकेतील राष्ट्रीय मेडिकल इन्स्टिट्यूट च्या अहवालानुसार, मधुमेहच्या रोगींसाठी जवसाचे सेवन खूप फायदेशीर आहे. अहवालानुसार, जवस खाणाऱ्यांच्या रक्तात खाण्यापूर्वीचा शुगरचा स्तर २० टक्क्यांपर्यंत कमी झाल्याचे दिसून आले आहे.


जवसात म्यूसिलेजही आढळून येते. म्यूसिलेज एक चिकट, जेल सारखा फायबर आहे. यामुळे आपली अन्न पचवण्याची प्रक्रिया मंद होते. त्यामुळे ग्लूकोज सहजपणे रक्तात मिसळते. प्राथमिक अभ्यासानुसार समोर आले आहे की, जवस डायबिटीजच्या दुष्परिणांमापासून आपल्याला वाचवतो. जवस/अळशीत एसडीजी नावाचे तत्त्व आढळून येतात. एसडीजी, टाइप-२ डायबिटीजची प्रक्रिया मंद करतो.

**३. हृदयाचा मित्र जवस/अळशी-** जवस/अळशीमध्ये ओमेगा-३ फॅटी ॲसिड भरपूर प्रमाणात असते. आपल्या याच गुणांमुळे जवस हृदयाच्या धमनी च्या आजारांपासून वाचवते. ओमेगा-३ मुळे नसांची काम करण्याची क्षमता वाढते. कोस्टा रिका येथे केलेल्या अभ्यासात जवस खाल्ल्याने हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका कमी असतो, असे समोर आले आहे.

**४. गुडघ्याच्या आजारावर प्रभावी जवस-** रोज केवळ दोन चमचे जवस/अळशीची पावडर सेवन केल्यास आपल्याला रोजच्या गरजेच्या १४० टक्के जास्त ओमेगा -३ मिळते. हे महत्त्वपूर्ण तत्त्व आपल्याला गुडघ्याच्या दुखण्यापासून वाचवते. सांधेदुखीच्या रुग्णांनीही जवसाचे रोज सेवन केले पाहिजे.

**५. वजन कमी करण्यासाठी जवस/अळशी**- जवसमध्ये मोठ्या प्रमाणात फायबर असते. त्यामुळे आपल्याला आपले वजन नियंत्रित करण्यास मोठी मदत मिळते. जवस/अळशी आपली भूक कमी करते. त्यामुळे आपल्याला पोट भरल्याची जाणीव होते. त्यामुळे आपल्याला वजन कमी करण्यास मदत मिळते.

# ऐन हिवाळ्यात सुका मेवा 'गरम' पौष्टिक लाडू खाताहेत भाव !



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती -** ऐन हिवाळ्यात सुका मेव्याच्या दरवाढीमुळे घरी पौष्टिक लाडू बनविणे जरा कठीण जात आहे. तरी मोठ्या हौशीने आपल्या मुला-मुलींना, सूनबाई व नातवंडांना आजीबाई मेथी, डिंक, उडदाचे पौष्टिक लाडू बनवून खाऊ घालत आहेत.

ग्रामीण भागात आजही हिवाळ्याची चाहुल लागली की महिलांची लाडू तयार करण्यासाठी लगबग सुरू होते. आणि घरातील आजीबाईंची लाडू तयार करण्यासाठी लगीन घाई सुरू होते. लाडू तयार करून कुटूंबाला खाऊ घालण्यात त्यांना वेगळाच आनंद मिळत असतो.हिवाळ्यात रब्बी हंगामात शेतात अनेक अंग मेहनतीचे कामे शेतकऱ्यांना करावी लागत असतात. त्यामुळे त्यांचे आरोग्य चांगले राहण्यासाठी या लाडूचे सेवन करणे फायदेशीर ठरतात.

परंतू शहरी भागात मात्र काही छोट्या कुटुंबाची मदार तयार लाडूवर आहे. त्याचे कारण असे आहे की, पती-पत्नी दोघेही नोकरी करतात त्यामुळे त्यांची पसंती रेडिमेड पौष्टिक लाडू तयार करुन घेण्यावर जास्त असते. यंदा नेहमीपेक्षा सुका मेवा व रेडिमेड लाडूंची मागणी चौपट वाढल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

## असे आहेत लाडूसाठी आवश्यक पदार्थांचे भाव

| प्रकार | भाव(किलो) |
|---|---|
| काजू | ९५०-१००० रु. |
| बदाम | ७६०-१००० रु. |
| पिस्ता | २०००-२२०० रु. |
| अक्रोड मगज | १२००-१६०० रु. |
| किसमिस | २६०-५०० रु. |
| काळी मनुका | ५००-८०० रु. |
| खारीक | २००-६०० रु. |
| खोबरे | २२०-२४० रु. |
| डिंक | ४००-१००० रु. |
| गोडंबी | १२५०-१३०० रु, |
| मेथी | १००-१२० रु |
| गूळ | ६०-६५ रु. |
| पिठी साखर | ५५-६० रु. |
| उडीद डाळ | १३०-१४० रु. |
| डाळ | १३०-१४० रु. |

मेथी, डिंकाचे लाडू खा, हा होईल फायदा

* हिवाळ्यात मेथीचे व डिंकाचे लाडू हमखास बनविले जातात. थंडीने छातीत कफ जाम होणे, सर्दी होणे, असे आजार होतात. यावर मेथीचे लाडू लाभदायक ठरतात.

* विशेषतः मुलांना असे लाडू खाऊ घालतात; ज्यामुळे हाडे मजबूत होऊन रोगप्रतिकारकशक्ती वाढते. अशक्तपणा कमी होण्यास मदत होते.

बद्धकोष्ठता, सांधेदुखी दूर होते, अशी माहिती आहारतज्ज्ञांनी दिली.

मगज, काजू, गोडंबी महागले

दीड महिन्यापूर्वी अक्रोड मगज १ हजार १०० ते १ हजार ४०० रुपये किलो भाव होता. सध्या १ हजार २०० ते १ हजार ६०० आहे. काजू ८०० वरून १ हजारावर, गोडंबी २०० रुपयांनी महाग झाली असून १ हजार ३०० रुपये आहे. मात्र, नवीन खारकेची आवक सुरु झाल्याने किलोमागे १०० रुपयांनी भाव घसरले असून २०० ते ६०० रुपये किलो विक्री होत आहे. पिस्ता २०० रुपये कमी होऊन २ हजार ते २ हजार २०० रुपये आहे.

# विभागीय आयुक्तालयात ९ डिसेंबरला विभागीय लोकशाही दिन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती,** विभागीय लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी आयोजित करण्यात येतो. त्यानुसार येत्या सोमवारी (दि. ९ डिसेंबर रोजी) सकाळी ११ वाजता विभागीय लोकशाही दिन व महिला लोकशाही दिनाचे आयोजन विभागीय आयुक्त कार्यालयात करण्यात आले आहे.

विभागीय लोकशाही दिनासाठी यापूर्वी प्राप्त तक्रारींचे निराकरण करण्यात येईल. विभागीय लोकशाही दिनात तक्रार नोंदविण्यासाठी नागरिकांनी तसेच महिलांनी त्यांचे तक्रार अर्ज (तालुका, जिल्हा किंवा महापालिका लोकशाही दिनानंतर) विहित नमुन्यात १५ दिवस अगोदर दोन प्रतीत पाठविणे आवश्यक राहील. नागरिकांनी तक्रार अर्ज वलसरीरींरींळसारळश्र.लो किंवा dcgšam ravatired iffmail. com या ई-मेलवर विहित नमुन्यात पाठविण्याचे आवाहन आयुक्तालयाच्यावतीने करण्यात आले आहे.-



कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२८१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि.५ डिसेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## मी देवेंद्र सरिता गंगाधरराव फडणवीस.... शपथ घेतो की... महाराष्ट्रात 'देवेंद्र' पर्वाला सुरुवात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ मुंबई**

भाजप हा एकमेव पक्ष आहे, जिथं पक्षाचा कार्यकर्ता देशाच्या पंतप्रधान पदापर्यंत पोहचू शकतो, असं भाजप नेते ठामपणे सांगतात. राष्ट्र प्रथम, पुन्हा पक्ष आणि शेवटी मी या धारणेनं चालणाऱ्या भाजपच्या बूथ कार्यकर्ता ते महाराष्ट्र राज्याचे तिसऱ्यांदा मुख्यमंत्री असा काटेरी राजकीय वाट तुडवत तुडवत प्रवास करणारे भाजप नेते म्हणजे देवेंद्र फडणवीस. आज महाराष्ट्राचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी शपथ घेतली. तर उपमुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे व अजित पवार यांनी देखील शपथ घेतली.

मुंबई येथील आझाद मैदानावर हा ग्रँड सोहळा पार पडला.या सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह केंद्रीय मंत्री, अन्य राज्यांचे मंत्री, २२ राज्यातील मुख्यमंत्री इतर मंत्री उपस्थित होती. या सोबतच अनेक दिग्गज मंडळी, संत-महंत, लाडक्या बहिणी, शेतकरी आणि हजारो कार्यकर्ते उपस्थित होते.

नागपूरमधील गंगाधर आणि सरिता फडणवीस यांच्या कुटुंबात २२ जुलै १९७० रोजी देवेंद्र यांचा जन्म झाला. ५ वेळा आमदार राहिलेल्या काकू शोभाताई फडणवीस आणि आमदारकी भूषवलेल्या वडिलांकडून घरातूनच राजकारणाचे धडे गिरवत ते समाजकारणात पुढे आले, सोबतीला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची






शिकवणही कुटुंबातून व नागपूरच्या शाखेतून, संघाच्या मुख्यालयातून मिळालेली. त्यामुळे, देवेंद्र फडणवीस यांच्यातील नेतृत्वगुणाचा पाया येथूनच भक्कमपणे रचला गेला. महाविद्यालयीन जीवनातच त्यांनी आपल्यातील नेतृत्वगुणाला चालना दिली. अभाविपचे कार्यकर्ता बनून त्यांनी राजकीय कामाला सुरुवात केली, नागपूर विद्यापीठातून कायद्याची पदवी घेत असताना महाविद्यालयीन निवडणुकांमध्येही सक्रीय सहभाग घेतला. सन १९९२ साली त्यांनी नागपूर विद्यापीठातून एलएलबीचे शिक्षण पूर्ण केले, याच काळात त्यांना नगरसेवकपदी संधी मिळाली. १९९२ ते ९७ आणि १९९७ ते २००१ या काळात ते नगरसेवक राहिले. याच काळात नागपूरच्या महापौरपदाची माळही त्यांच्या गळ्यात पडली. दरम्यान, महानगरपालिकेच्या निवडणुकांसाठी वार्डातील बूथवरील कार्यकर्ता ही भूमिका देखील देवेंद्र फडणवीस यांनी भूषवली. त्यामुळेच, बूथ कार्यकर्ता ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असा त्यांचा राजकीय प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे.

नागपूर महापालिकेचं महापौर पद भूषवल्यानंतर त्यांनी पुन्हा मागे वळून पाहिलं नाही. सन १९९९ साली झालेल्या विधानसभा निवडणुकांमधून ते पहिल्यांदा राज्याच्या विधानसभेत पोहोचले. १९९९ ते २०२४ या सलग २५ वर्षे आमदार बनून ते विधानसभेचे सदस्य राहिले आहेत. नुकत्याच झालेल्या निवडणुकीतही त्यांनी मोठ्या फरकाने विजय मिळवत मुंबई गाठली, तर त्यांच्याच नेतृत्वात भाजपने १३२ जागांचा विक्रमी आकडाही गाठल्याचं महाराष्ट्राने पाहिलं. तर, शरद पवारानंतर सर्वात कमी वयाचे मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणारे दुसरे आमदार आहेत. सन २०१४ मध्ये भाजप -शिवसेना युतीचं सरकार आल्यानंतर ते महाराष्ट्राचे पहिल्यांदा मुख्यमंत्री बनले. त्यानंतर, २०१९ मध्येही त्यांनी दीड दिवसांचे मुख्यमंत्री म्हणून त्यांची कारकिर्द महाराष्ट्राने पाहिली आहे. मात्र, २०१९ ते २०२४ या पाच वर्षात महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक नागमोडी वळणं आली, राजकीय स्थित्यंतरे बदलली आणि देवेंद्र फडणवीस यांनी २०२२ मध्ये पुन्हा उपमुख्यमंत्रीपदी शपथ घेतली. त्यामुळे, राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि विरोधी पक्षनेते अशी तिहेरी भूमिका एकाच टर्ममध्ये बजावणारे नेते म्हणूनही देवेंद्र फडणवीस यांनी वेगळाच रेकॉर्ड बनवला आहे. राष्ट्र गीताने या शपथविधी सोहळ्याचा समारोप झाला.

## मुख्यमंत्री फडणवीसांचा 'महा'शपथविधी सोहळा

### अशी होती विशेष आमंत्रित पाहुण्यांची आसन व्यवस्था

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५मुंबई**

आज महायुती सरकारचा ग्रँड शपथविधी सोहळा पार पडला . या 'महा' शपथविधी सोहळ्यात देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्रिपदाची तर अजित पवार आणि एकनाथ शिंदे हे उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली मुंबईच्या आझाद मैदानात या सोहळ्याचं भव्य असं आयोजन करण्यात आलं होत . या शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि इतर केंद्रीय मंत्री उपस्थित होते . २२ राज्याचे मुख्यमंत्री देखील या शपथविधी सोहळ्यासाठी मुंबईत आले होते . तब्बल चाळीस हजार नागरिक या सोहळ्याला उपस्थित होते . शपथविधी सोहळ्यासाठी लाडक्या बहिणींना विशेष निमंत्रण देण्यात आलं होते . तसेच या सोहळ्याला विविध क्षेत्रातील दिग्गज




आणि मान्यवर उपस्थित होते

या ग्रँड शपथ विधी सोहळ्यात पहिल्या रांगेत अंबानी कुटुंबीय देवेंद्र फडणवीस यांचे कुटुंबीय पृथ्वीराज चव्हाण अशोक चव्हाण, निलम गोऱ्हे, नारायण राणे, उदयनराजे भोसले, राम नाईक उपस्थित होते.तर दुसऱ्या रांगेत मर्चंट कुटुंबीय कुमार बिर्ला अजय पिरामल उदय कोटक शाहरुख खान सलमान खान सचिन तेंडुलकर अंजली तेंडुलकर दिलीप संघवी अनिल अंबानी रणबीर कपूर रणवीर सिंह गीतांजली किर्लोस्कर बिरेंद्र सराफ अनिल काकोडकर यांची व्यवस्था करण्यात आली होती.

दरम्यान महायुतीच्या नव्या सरकारमध्ये देखील जुनाच पॅटर्न कायम ठेवण्यात आला आहे. नव्या सरकारमध्ये देखील एक मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री आहेत. आज देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली . तर अजित पवार व एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली

## विरोधकांना माफी हाच आपला बदला असणार - देवेंद्र फडणवीस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५मुंबई**

देवेंद्र फडणवीस तिसऱ्यांदा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेण्यासाठी सज्ज झाले आहेत. याआधी दोन वेळा त्यांनी हे पद भूषवलं आहे. त्यातील पहिली टर्म त्यांनी पूर्ण केली असून दुसऱ्यावेळी मात्र अवघ्या ७२ तासांसाठी ते पदावर होते. त्यामुळे सर्वात कमी काळ मुख्यमंत्रीपदी असणारे नेते ही नोंदही त्यांच्यानावे झाली आहे. पण यंदा भरभक्कम बहुमताच्या जोरावर पूर्ण कार्यकाळ पदावर राहण्यासाठी फडणवीस सज्ज झाले आहेत. त्रवपर्रीळी ३.० अर्थात देवेंद्र फडणवीसांची ही तिसरी टर्म कशी असेल? याबाबत आता चर्चा सुरू झालेली असतानाच त्यांनी एका मुलाखतीमध्ये त्याबाबत सूचक भाष्य केलं आहे.

यंदाच्या निवडणुकीत विरोधकांना जनतेनं साफ नाकारल्याचं चित्र निर्माण झालं आहे. २८८ पैकी अवघ्या ४९ जागांवर महाविकास आघाडी अडकली. उलट महायुतीच्या पारड्यात जनतेनं तब्बल २३५ जागांचं भरभरून दान दिलं. त्यामुळे राज्यात पुन्हा महायुतीचं सरकार येणार यावर शिक्कामोर्तब झालं. एकीकडे लोकसभा निवडणुकीतील कौल विधानसभेला उलट कसा झाला? यावर महाविकास आघाडीमध्ये विचारमंथन चालू असताना



दुसरीकडे महायुतीमध्ये कुणाला किती आणि कुठली मंत्रीपदं मिळणार यावर बैठका होत आहेत. पण फडणवीसांचं मुख्यमंत्रीपद निश्चित झाल्यानंतर त्यांनी विरोधकांबाबत केलेलं सूचक विधान सध्या चर्चेत आलं आहे.

**पातळी सोडून टीका झाली, पण आता**

गेल्या अडीच वर्षांत विरोधकांकडून पातळी सोडून आपल्यावर टीका झाली, पण आता ते सगळं विसरून काम करणार असल्याचं फडणवीस म्हणाले आहेत. एका वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीमध्ये त्यांनी आपली भूमिका मांडली आहे. २०२२ च्या सत्तांतरानंतर फडणवीसांनी भर विधानसभेत बोलताना विरोधकांना माफ करून त्यांचा बदला घेणार असल्याचं विधान केलं होतं. याहीवेळी विरोधकांना माफी हाच आपला बदला असणार असल्याचं ते म्हणाले आहेत.

विरोधकांनी माझ्यावर बदनामीजनक टीका-टिप्पणी केली. मी पुन्हा एकदा त्यांचा बदला घेणार आहे. पण याहीवेळी त्यांना मी माफ केलं असून त्यांना माफी हाच माझा बदला आहे. मी कधीच कुणाचा द्वेषी नव्हतो. काहींनी त्यांच्या फायद्यासाठी माझी एखाद्या खलनायकासारखी प्रतिमा तयार केली. पण जनतेनं आमच्यावर विश्वास दाखवून त्या सगळ्यांना परस्पर उत्तर दिलं आहे, असं देवेंद्र फडणवीस या मुलाखतीमध्ये म्हणाले. दरम्यान, यावेळी विरोधकांची संख्या विधानसभेत खूप कमी असली, तरी तेही लोकप्रतिनिधीच असून त्यांच्या भूमिकांकडे अजिबात दुर्लक्ष करणार नाही, असं फडणवीस म्हणाले आहेत.

## सेनेच्या आमदारांची यशस्वी मनधरणी

### उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेण्यासाठी एकनाथ शिंदे राजी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ मुंबई**

विधानसभा निवडणुकांमध्ये स्पष्ट बहुमत मिळाल्यानंतर महाराष्ट्रामध्ये आज महायुती सरकारचा शपथविधी सोहळा पार पडत आहे. मुंबईच्या आझाद मैदानावर होत असलेल्या या भव्य सोहळ्यात देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्रीपदाची तर अजित पवार हे उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार हे निश्चित आहे. मात्र माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मात्र उपमुख्यमंत्रिपद घेण्यास नकार दिला होता, त्यामुळे शिंदे नेमके सत्तेत सहभागी होणार का? याबाबतचा सस्पेन्स अद्याप कायम होता. अखेर तो सस्पेन्स दुपारी २.२० ला संपला व् .उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेण्यासाठी एकनाथ शिंदे हे राजी झाले आहेत शिवसेनेच्या सर्व आमदारांनी यशस्वी मनधरणी केली व् त्यात ते यशस्वी झाले.

आज फक्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित



पवार आणि एकनाथ शिंदे यांचा शपथविधी होईल, अशी महत्वाची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे. राज्यपालांना यासंबंधीचे पत्रही देण्यात आलं आहे.महायुती सरकारचा इतर मंत्र्यांच्या शपथविधीसह मंत्रिमंडळ विस्तार हा नागपूर अधिवेशनाआधी होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या सहमतीनेच इतर मंत्र्यांचा शपथविधी पुन्हा पुढील काही दिवसात घेण्याचे एकमताने ठरल्याची माहिती विश्वसनीय सुत्रांनी दिली आहे. भारतीय जनता पक्षासह शिंदेसेनेच्या नेत्यांनीही एकनाथ शिंदेंनी सरकारमध्ये सहभागी व्हावे, असा आग्रह केला होता.

अखेर आता त्यांनी हा महत्वाचा निर्णय घेतल्याचे दिसत आहे. दरम्यान, एकनाथ शिंदे हे गृहमंत्रीपदासाठी आग्रही आहेत. याबाबत अद्याप निर्णय झाला नसला तरी महसूल खाते तसेच नगर विकास खाते हे शिवसेना शिंदे सेनेकडे जाण्याची शक्यता आहे. आता नागपूर अधिवेशनाआधी होणाऱ्या मंत्रिमंडळ विस्तारात कोणाची वर्णी लागणार? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

## ११ डिसेंबर रोजी मंत्र्याचा शपथविधी सूत्रं काय? कुणाला किती मंत्रिपदं मिळणार?



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५मुंबई**

महाराष्ट्रात आजपासून देवेंद्र पर्वाला सुरुवात होणार आहे. भाजपचे ज्येष्ठ नेते देवेंद्र फडणवीस हे आज तिसऱ्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहेत. महाराष्ट्राचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस हे शपथ घेतील. देवेंद्र फडणवीसांसोबतच राष्ट्रवादीचे नेते अजित पवार हे उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहेत. आज होणाऱ्या शपथविधी सोहळ्यावेळी शिवसेना नेते एकनाथ शिंदे हे उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार की नाही, हे अजूनही गुलदस्त्यात आहे. त्यातच आता मंत्रिमंडळ विस्तार कधी होणार याची माहिती समोर आली आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आज आझाद मैदानावर फक्त मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्र्यांचा शपथविधी पार पडणार आहे. त्यानंतर नव्या फडणवीस सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार नागपूर अधिवेशनापूर्वी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. येत्या ११ डिसेंबर रोजी फडणवीस सरकारचा पहिला मंत्रिमंडळ विस्तार होईल, असे सांगितले जात आहे. या मंत्रिमंडळ विस्तारावेळी ३३ जणांचा शपथविधी होईल, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

**फडणवीसांच्या मंत्रिमंडळात किती मंत्री असणार?**

नागपूरच्या हिवाळी अधिवेशनापूर्वी नव्या मंत्रिमंडळाचा विस्तार होणार असल्याचे बोललं जात आहे. यात राष्ट्रवादीचे ८ नेते, शिवसेना शिंदे गटातील १० नेते आणि भाजपचे १५ नेते मंत्रिपदाची शपथ घेतील. यानुसार फडणवीसांच्या नवीन मंत्रीमंडळात दोन उपमुख्यमंत्र्यांसह ३३ जणांचा समावेश असेल, असे म्हटलं जात आहे.

## नाथांचा नाथ एकनाथ शिंदेंनी घेतली उपमुख्यमंत्रिपदाची शपथ, शिवसैनिक भारावले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५मुंबई**

शिवसेनेचे पक्षप्रमुख आणि राज्याचे माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी मुंबईतील आझाद मैदानात संपन्न झालेल्या महायुती सरकारच्या शपथविधी सोहळ्यात राज्याच्या उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. महायुतीच्या या शपथविधी सोहळ्याला विविध राज्यांचे मुख्यमंत्री, अनेक मान्यवर, बॉलीवूड सेलिब्रिटी आणि भाजपचे राज्यभरातील कार्यकर्ते उपस्थित होते.




तत्पूर्वी आज सकाळपासून एकनाथ शिंदे हे उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार की नाही, याबाबत संभ्रम होता. एकनाथ शिंदे यांनी गृहमंत्रीपदाची मागणी लावून धरली होती. मात्र, भाजप गृहखाते शिवसेनेला सोडण्यास तयार नाही. त्यामुळे एकनाथ शिंदे हे मंत्रिमंडळात सामील व्हायचे की नाही, या विचारात होते. मात्र, एकनाथ शिंदे हे मंत्रिमंडळात नसल्यास चुकीचा राजकीय संदेश जाऊ शकतो, ही बाब ध्यानात घेऊन भाजपचे नेते एकनाथ शिंदे यांच्या मनधरणीसाठी प्रयत्नशील होते. परंतु, एकनाथ शिंदे यांनी मंत्रिमंडळात सहभागी व्हायचे की नाही, हा सस्पेन्स शेवटपर्यंत कायम ठेवला होता. अखेर शपथविधीसाठी अवघे दोन तास शिल्लक असताना एकनाथ शिंदे यांच्याकडून उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानंतर शिवसेनेचे शिष्टमंडळ राजभवनात गेले आणि त्यांनी राज्यपालांकडे एकनाथ शिंदे यांच्या उपमुख्यमंत्रिपदाच्या शपथविधीचे पत्र सुपूर्द केले होते.

एकनाथ शिंदे यांनी आजच उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घ्यावी, यासाठी देवेंद्र फडणवीस यांनी जातीने प्रयत्न केले होते. त्यांनी बुधवारी वर्षा बंगल्यावर दोनवेळा जाऊन एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती. वर्षा बंगल्यावरील अँटी-चेंबरमध्ये उभय नेत्यांमध्ये चर्चा झाली होती. यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी एकनाथ शिंदे यांच्या गृहमंत्रीपदाच्या मागणीचा भाजप नेतृत्त्वाकडून विचार केला जाईल, असे सांगितले. आपल्याला एकत्र मिळवून सरकार चालवायचे आहे. आपण कोणालाही साईड कॉर्नर करणार नाही. आपल्याला सगळ्यांना घेऊन पुढे जायचे आहे. तुम्ही आज शपथ घेतली नाही तर चुकीचा अर्थ काढला जाईल, असे फडणवीसांनी एकनाथ शिंदे यांना सांगितले. याशिवाय, शिवसेनेच्या सगळ्या आमदारांकडून काल रात्रीपासून एकनाथ शिंदे यांची समजूत काढण्याचे प्रयत्न सुरु होते. तुम्ही मंत्रिमंडळात असणे महत्त्वाचे आहे. तुमच्याशिवाय आम्हीदेखील मंत्रिमंडळात बसणार नाही, अशी निर्वाणीची भूमिका शिवसेनेच्या आमदारांनी घेतली. या सगळ्यानंतर एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेण्याचा निर्णय घेतला होता.

## अजय-अतुलच्या सुरांची मैफिल ते सलमान, शाहरुख, माधुरी अन्...;

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या शपथविधीला सेलिब्रिटींची मांदियाळी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि,५ मुंबई**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत प्रचंड बहुमत मिळाल्यानंतर महायुतीने अखेरीस सत्ता स्थापनेचा दावा केला आहे. आज (०५ डिसेंबर २०२४ ) मुंबईतील आझाद मैदानावर महायुती सरकारचा भव्य शपथविधी सोहळा आयोजित करण्यात आला आहे. देवेंद्र फडणवीस हे आज महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार आहे. तिसऱ्यांदा देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शपथविधी सोहळ्याचं जंगी आयोजन करण्यात आलं आहे. या सोहळ्याला अनेक दिग्गजांनी उपस्थिती दर्शविली आहे. हजारोंच्या संख्येने नेते, कार्यकर्त्यांनी हजेरी लावली आहे. तर या सोहळ्यासाठी विविध क्षेत्रातील दिग्गजांना आमंत्रित करण्यात आलं आहे. महायुतीच्या शपथविधी सोहळ्यातील काही दृश्ये समोर आली आहेत. मराठीतील सुप्रसिद्ध गायक अजय-अतुल यांच्या सुरेल आवाजाने या सोहळ्याची रंगत वाढवली. या सोहळ्याला बॉलिवूडची धक धक गर्ल माधुरी दीक्षितनेही हजेरी लावली आहे. माधुरीने पती डॉ. नेने यांच्यासह उपस्थिती दर्शविली. बॉलिवूड अभिनेता रणवीर सिंग यानेही या शपथविधी सोहळ्याला उपस्थिती दर्शवली. या सोहळ्यासाठी संजय दत्तनेही हजेरी लावली. भाईजान सलमान खानही या शपथविधी सोहळ्याला उपस्थित आहे.

## विधिमंडळाचे तीन दिवसीय अधिवेशन ७ डिसेंबरपासून होणार सुरू : ९ डिसेंबरला बहुमत चाचणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५मुंबई**

विधिमंडळाचे तीन दिवसीय अधिवेशन ७ डिसेंबरपासून सुरू होणार आहे. या अधिवेशनात विधानसभा अध्यक्षांची निवड होणार आहे. तर ९ डिसेंबरला बहुमत चाचणी घेण्यात येणार आहेत. अधिवेशनात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन हे विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहाला संबोधित करणार आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी गुरुवारी सांगितले, १५ व्या



विधानसभेचे नवनिर्वाचित २८८ सदस्य ७ आणि ८ डिसेंबर रोजी शपथ घेणार आहेत. ९ डिसेंबर रोजी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन संयुक्त अधिवेशनाला संबोधित करणार आहेत. तसेच विधानसभा अध्यक्षपदाची निवडणूक होणार आहे. त्याचदिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारची बहुमत चाचणी होणार आहे. पुढे पवार म्हणाले, अधिवेशनादरम्यान राष्ट्रवादीच्या नेत्यांची भेट घेणार आहे. त्यानंतर मंत्रिमंडळातील जागावाटपाबाबत चर्चा करणार आहेत.

# मुलींना मिळणार १ लाख रुपये! लेक लाडकी योजना

## ग्रामीण भागात सुरू आहे घरोघरी जनजागृती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ अमरावती –** मुलींच्या जन्मास प्रोत्साहन मिळावे, मुलींचा जन्मदर वाढावा, तीच्या शिक्षणास चालना मिळावी, बालविवाह थांबावे, मुलींचे कुपोषण कमी व्हावे आदी बाबींचा विचार करता, सरकारने लेक लाडकी योजना सुरू केली. याअंतर्गत अंगणवाडीसेविका घरोघरी जनजागृती करीत आहे. आता मुलगी झाल्यास पालकांवरील बोजा कमी करून तिला १८ वर्षे वयापर्यंत १ लाख १ हजार रुपये मिळणार आहेत.मुलींच्या सक्षमीकरणासाठी लेक लाडकी योजना राज्य सरकारने सुरू केली आहे. या योजनेच्या माध्यमातून गरीब कुटुंबातील मुलींना लाभ दिला जाणार आहे. १ एप्रिल २०२३ पासून जन्मलेल्या मुलींना 'लेक लाडकी' योजनेंतर्गत १ लाख १ हजार रुपयेआर्थिक मदत देण्यात येणार आहे. यासाठी जिल्ह्यात शासनस्तरावरून प्रचार व प्रसार केला जात आहे. यासाठी अंगणवाडीसेविका परिश्रम घेत आहेत. अंगणवाडी केंद्राच्या माध्यमातून लेक लाडकी योजनेची जनजागृती केली जात आहे.माहितीसाठी अंगणवाडी केंद्र,अंगणवाडी सेविका यांच्याशी संपर्क साधावा.



### कुटुंब नियोजन प्रमाणपत्र

१ एप्रिल २०२३ नंतर जन्मणार्या १ अथवा २ मुलींना त्याच प्रमाणे १ मुलगा व १ मुलगी असल्यास मुलीला या योजनेचा लाभ मिळेल. दुसर्या प्रसुतीच्या वेळी जुळी अपत्ये जन्माला आल्यास १ मुलगा किंवा दोन्ही मुलींना या योजनेचा लाभ मिळेल.

### कोणती लागणार कागदपत्रे ?

जन्माचा दाखला, कुटुंब प्रमुखाच्या उत्पन्नाचा दाखला, लाभार्थीचे आधार कार्ड, पालकाचे आधार कार्ड, बँकेच्या पासबुकची झेराक्स, रेशनकार्ड, मतदान ओळखपत्र, दाखला, आदी कागदपत्रे लागणार आहेत.

### असा मिळणार लाभ?

पिवळ्या व केशरी रेशनकार्डधारक कुटुंबात मुलीचा जन्म झाल्यावर ५ हजार रुपये, इयत्ता पहिलीत गेल्यावर ६ हजार रुपये, सहावीत गेल्यावर ७ हजार रुपये, १२वीत गेल्यावर ८ हजार रुपये, १८ वर्षे पूर्ण झाल्यावर ७५ हजार रुपये, अशा रितीने एकूण १ लाख १ हजार रुपये एवढा लाभ मिळणार आहे.

अंगणवाडी सेविकेकडे करा अर्ज!या अर्जात वैयक्तिक माहिती, पत्त्याची माहिती, मोबाइल नंबर, अपत्याची माहिती, बँक खात्याचा तपशील आणि योजनेच्या कोणत्या टप्यातील लाभासाठी अर्ज केला ते लिहायचं आहे. अर्ज भरून झाला की, अंगणवाडी सेविकेकडून पोहोचपावती घ्यायची आहे.

# ५९ प्राथमिक आरोग्य केंद्रातील जैव वैद्यकीय कचरा उघड्यावरच पडून

## विल्हेवाट लावणारी यंत्रणाच गायब

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ अमरावती –** जिल्ह्यातील ५९ प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये जैव वैद्यकिय कचर्‍याची (बायोमेडिकल वेस्ट) विल्हेवाट लावणारी यंत्रणाच नसल्याने संसर्गजन्य रोगांचा प्रसार होण्यासोबतच जमीन, वायू प्रदूषणाचा धोकाही वाढला आहे. या कचर्‍याची विल्हेवाट ४८ तासांच्या आत कायद्यानुसार लावणे बंधनकारक असताना बर्‍याच शासकीय व खासगी रुग्णालयांबाहेर तो तसाच पडून असल्याचे दिसून आले. ही गंभीर बाब होय. याला आरोग्य यंत्रणा, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची उदासीन भूमिकाही तेवढीच कारणीभूत आहे.



जैव वैद्यकिय कचरा नष्ट करणे महागडे असल्याने एकतर तो जमिनीत तसाच गाडला जातो किंवा सर्रास पेटवला जात आहे. यामुळे पर्यावरणाची समस्या निर्माण होत आहे. एकीकडे पर्यावरण रक्षणासाठी शासन कोट्यवधी रुपये खर्च करत असताना जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा मात्र निद्रावस्थेत असून जैव वैद्यकिय कचरा तसाच सोडून लोकांच्या आरोग्याशीच खेळ सुरू आहे. जिल्ह्यात बडनेरा येथे कॉमन ट्रीटमेंट डिस्पोजल मॅनेजमेंट प्लान्ट असला तरी तेथे जिल्हाभरातून जैव वैद्यकीय कचरा आणणे खर्चिक असल्यामुळे तो जागच्या जागी तसा सोडला जात असून जेव्हा मोठ्या प्रमाणात कचरा गोळा झाला तेव्हाच तो गाडला किंवा पेटवला जात आहे. प्रति खाट (बेड) नुसार हा कचरा नष्ट करण्यासाठी शासनाकडून निधी मिळत असतो. हा कचरा किती अंतरावर नेऊन नष्ट करायचा यानुसार हा निधी ठरवला जातो. परंतु, शासनाकडे यासाठी प्रस्ताव पाठवल्यानंतरही अद्याप मंजुरी मिळाली नसल्याची माहिती जिल्ह्याच्या आरोग्य विभागाद्वारे देण्यात आली.कोणतीही स्वतंत्र यंत्रणा नाही.

त्यामुळे ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांसह खासगी रुग्णालयातील जैव वैद्यकिय कचरा हा उघड्यावर फेकल्या जात आहे. शासनाने जैव वैद्यकिय कचरा नियम १९९८ तसेच व्यवस्थापन नियम २०१६ तयार केले. परंतु, त्याचे पालन जिल्ह्यात होताना दिसत नाही. सर्रास जाळला जातो कचरा : काही ठिकाणी जैव वैद्यकिय कचरा तसाच फेकला जातो. कायदेशीरपणे हा कचरा ४८ तासांच्या आत नष्ट करावा, असे सर्वच पीएचसींना कळवले आहे. सोबतच जर जिल्हा परिषद प्रशासन दखल घेत नसेल तर त्यांना नोटीस द्यावी लागेल, असा इशाराही दिला आहे.

### शासन स्तरावर मंजुरी प्रस्ताव पाठवण्याची प्रक्रीया पूर्ण

शहरी भागात जैव वैद्यकीय कचर्‍याची विल्हेवाट लावण्यासाठी यंत्रणा कार्यान्वित आहे. ग्रामीण भागात ही यंत्रणा अस्तित्वात नाही. त्यामुळे तुर्तास हा कचरा रासायनिक प्रक्रिया करून खड्डयात पुरला जातो. कचर्‍याची विल्हेवाट लावण्याकरीता शासन स्तरावर प्रस्ताव पाठवला आहे.
डॉ. सुरेश आसोले, जिल्हा आरोग्य अधिकारी, अमरावती.

# ज्ञान विज्ञान महोत्सव २०२४-२५आसरा येथे विज्ञान प्रदर्शनीचे थाटात उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५भातकुली–** पुरोगामी माध्यमिक विद्यालय आसरा येथे प्रत्येक विद्यार्थ्यांनपर्यत सहज सोप्या पद्धतीने विज्ञानातील संकल्पना पोहचव्यात, आपल्या रोजच्या जीवनातील साध्या सोप्या घटनेमधिल विज्ञान विद्यार्थ्यांना समजाव्यात म्हणून या प्रदर्शनी चे आयोजन केले जाते .या प्रदर्शनी चे उद्घाटन आसरा केन्द्राचे केन्द्र प्रमुख किशोर रूपनारायण यांनी केलेया प्रसंगी अनुदानित आश्रम शाळा भातकुली येथील मुख्याध्यापक जायदे सर, विज्ञान शिक्षक लाहोटी सर, पंकज दहिकर सरमुख्याध्यापिका विल्हेकर मँडम, सर्व शिक्षक,आसरा केन्द्रातील सर्व शाळेतील शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. प्रदर्शनी मध्ये सहभागी झालेल्या व आयोजनाकरीता सहकार्य करणार्या सर्वाचे आभार श्री गोपाल वडतकर सर विज्ञान शिक्षक पुरोगामी माध्यमिक विद्यालय आसरा यांनी केले.–




# सेमाडोहनजीक खासगी ट्रॅव्हल्स-चारचाकी धडकल्या

## व्याघ्र प्रकल्पाचे नियम, अरुंद रस्ते अपघातास कारणीभूत, जीवितहानी टळली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५धारणी–** चिखलदरा तालुक्यातील सेमाडोहनजीक पिली गावाजवळ मंगळवारी खासगी ट्रॅव्हल्स व चारचाकी धडकल्या. वाहनांचा चुराडा झाला. सुदैवाने कुठलीच जीवितहानी झाली नाही. यासंदर्भात वृत्त लिहिस्तोवर पोलिसात कुठल्याच प्रकारची माहिती नव्हती. मेळघाटातील घाटवळणाचे रस्ते वाहनचालकांसाठी जिवावर बेतणारे ठरले आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेली अपघातांची मालिका सुरूच आहे. व्याघ्र प्रकल्पाचे जाचक नियम व त्यातूनच कायम असलेले अरुंद रस्ते अपघाताला कारणीभूत ठरले आहेत.



परतवड्यावरून दुपारी एक वाजता खंडव्यासाठी जाणारी श्रीराम ट्रॅव्हल्सची बस (एमएच २७ बीवाय ३९१५) व विरुद्ध दिशेने येणाऱ्या चारचाकी वाहनाची धडक झाली. पिली गावाजवळ हा अपघात झाला. यातचारचाकी वाहनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.सुदैवाने कुठलीच जीवितहानी झाली नाही.

चारचाकीतील प्रवासी तुरळक जखमी झाल्याची माहिती असली तरी नजीकच्या सेमाडोह व हरिसाल येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात कुणी जखमी दाखल आले नसल्याची माहिती वैद्यकीय सूत्रांनी दिली.

**महिन्यापूर्वीच पाच जणांचा मृत्यू–** सेमाडोहनजीक एक महिन्यापूर्वीच पुलाखाली खासगी ट्रॅव्हल्स कोसळून पाच जणांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर अनेक मालवाहू ट्रक अपघातग्रस्त झाले. या मार्गावर अपघाताची मालिका नेहमीची आहे.

मंगळवारी दुपारी झालेल्या या अपघाताने पुन्हा एकदा त्या अपघाताची आठवण ताजी झाली. व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातून जाणारे रस्ते अत्यत अरुंद असून एक वाहन काढण्यासाठी दुसऱ्या वाहनाला रस्त्याच्या खाली उतरावेच लागते. अन्यथा धडक ठरलेली अशी ही अवस्था झाली आहे.

### राज्यातला एकमेव दुर्लक्षित आंतरराज्य महामार्ग

अमरावती ते परतवाडा, सेमाडोह, धारणी, खंडवा, इंदूर हा आंतरराज्य महामार्ग आहे. परतवाडानजीक बुरडघाट ते हरिसालपर्यंत पूर्णतः घाटवळणाचा अरुंद मार्ग आहे. या मार्गावरून मोठ्या प्रमाणात महाराष्ट्र, मध्य प्रदेश व इतर राज्यांमध्ये ये- जा करण्यासाठी प्रवासी व खाजगी वाहनांसह मालवाहू वाहनांसाठी हाच मार्ग आहे. या मार्गाचा प्रस्ताव पुलांची दुरुस्ती रुंद करण्याची मागणी व्याघ्र प्रकल्पाच्या जाचक नियमांमुळे अडकली आहे.

# निरोगी बालकांसाठी जंतनाशक मोहिम यशस्वी करावी : जिल्हाधिकारी

## नांदगाव पेठ येथे जंतनाशक मोहिमेला सुरवात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ अमरावती,**
बालकांच्या सुदृढ आणि निरोगी आयुष्यासाठी राष्ट्रीय जंतनाशक मोहिम राबविण्यात येत आहे. यात सर्व बालकांनी सहभागी होऊन गोळी घ्यावी. तसेच आरोग्य, महिला व बालविकास, आशासेविकांनी घरोघरी पोहोचून जंतनाशक मोहिम यशस्वी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले.जंतनाशक मोहिमेची सुरवात नांदगाव पेठ येथील सरस्वती गोसावी विद्यामंदिर आश्रमशाळेतून करण्यात आली. यावेळी नांदगाव पेठच्या सरपंच कविता डांगे, संस्थेचे उपाध्यक्ष सतिश पुरी, सचिव विनोद गोसावी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश असोले, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रविण पारिसे, जिल्हा साथ रोग अधिकारी डॉ. अली, जिल्हा आयुष अधिकारी डॉ. पल्लवी आगरकर, तालुका अधिकारी डॉ. सुर्यवंशी, शिक्षणाधिकारी अरविंद मोहरे, प्राचार्य श्रावण पवार, ग्रामपंचायत सदस्य वृशाली इंगळे, आदी उपस्थित होते.श्री. कटियार यांनी, बालकांच्या आरोग्याच्या दृष्टीने ही महत्वाची मोहिम आहे. जिल्ह्यात पाच लाखाहून अधिक बालकांना जंतनाशकाची गोळी देण्यात येणार आहे. या मोहिमेचा चांगला फायदा होणार आहे. बालकांची वाढ थांबलेली असल्यास यामुळे दूर करता येणार आहे. यात पालक, ग्रामपंचायत मोलाची भूमिका बजावू शकत असल्याने त्यांनी जनजागृती करावी. तसेच शाळा, अंगणवाडी यांनी बालकांना गोळी उपलब्ध करून द्यावी. या मोहिमेत एकही बालक वंचित राहू नये याची काळजी घ्यावी, असे सांगितले. डॉ. असोले यांनी प्रास्ताविकातून गोळी घेण्याचे महत्व सांगितले. वर्षातून दोन वेळा ही मोहिम राबविण्यात येते. याचा बालकांनी लाभ घ्यावा, तसेच हात धुण्याची सवय बाळगण्याचे आवाहन केले. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाळेतील बालकांना गोळी देऊन मोहिमेला सुरवात करण्यात आली. निलेश दळवी यांनी सूत्रसंचालन केले. एस. एस. पवार यांनी आभार मानले.



# मिनी ट्रॅक्टरसाठी साडे तीन लाखांचे अनुदान, असा करा अर्ज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत (Social Welfare) अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील स्वयंसहायता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर(चळपळ ढीरलीं डलहशाश) व त्याची उपसाधने यांचा पुरवठा योजना राबविण्यात येते. या योजनेच्या लाभासाठी इच्छुकांनी २३ डिसेंबर २०२४ पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहनसमाज कल्याण विभागाचेसहाय्यक आयुक्त देविदास नांदगावकर यांनी केले आहे.

या याजनेंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना (Saving Groups) ९ ते १८ अश्वशक्तीचा मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने (कल्टिव्हेटर किंवा रोटाव्हेटर व ट्रेलर) खरेदी करण्यासाठी रूपये ३ लाख ५० हजार कमाल मर्यादेत (९० टक्के शासकीय अनुदान व १० टक्के स्वयंसहाय्यता बचत गटांचा हिस्सा) अर्थसहाय्य केले जाते.

**अर्ज कसा करावा?**

सर्वप्रथम समाज कल्याण विभागाच्या https://mini.mahasamajkalyan.in/Homelogin.aspx?ReturnUrl=%2f या संकेतस्थळावर भेट द्या.

यातील ऑनलाईन अर्ज या पर्यायावर क्लिक करा.



आपल्यासमोर नोंदणी करण्याचा अर्ज उपलब्ध होईल. यात सुरुवातीला बचत गटाचे अध्यक्ष किंवा सचिव यांच्या नावेच रजिस्ट्रेशन करावे अशी सूचना दिसेल.

त्याखाली संपूर्ण नाव, मोबाईल नंबर, आधार कार्ड, ईमेल आयडी, पासवर्ड, बचत गटाचे नाव, अर्ज करावयाचा जिल्हा ही माहिती भरावी.

त्याखाली ठशसळीींशी बटणावर क्लिक करून नोंदणी करावी. ऑनलाइन माहिती भरल्यानंतर अर्जाची प्रिंट व सोबत ऑनलाईन जोडलेली कागदपत्रे यांची झेरॉक्स कॉपी जोडून कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. योजनेच्या अधिक माहिती तसेच इतर अटी व शर्तींच्याअधिक माहितीसाठी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय, नासर्डी पुलाजवळ, नाशिक क्लब समोर, नाशिक पुणे रोड, नाशिक यांच्या कार्यालयात संपर्क साधावा, असेही नमूद करण्यात आले आहे.

# रब्बी हंगामात सिंचनाला मिळणार पाच पाळ्यांत पाणी

## शेतकऱ्यांना दिलासा : हरभरा, गहू पिकांना लाभ, अप्परवर्धा प्रकल्पात पुरेसा जलसाठा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती** :यंदाच्या पावसाळ्यात झालेल्या पावसाने सिंचन प्रकल्पांत जलसाठा समाधानकारक प्रमाणात उपलब्ध आहे. त्यामुळे रब्बी हंगामातील सिंचनासाठी पाणीपुरवठा केला जाणार आहे. सध्या जिल्ह्यात सद्यस्थितीत ८५ टक्के जलसाठा उपलब्ध आहे. या जलसाठ्यातून रब्बी हंगामात पाच पाळ्यांमध्ये पाणी सोडले जाणार आहे.

जिल्ह्यात अप्परवर्धा या मोठ्या प्रकल्पांसह सात मध्यम व ४८ लघु असे एकूण ५६ सिंचन प्रकल्प आहेत. या सिंचन प्रकल्पाचा उपयुक्त साठा क्षमता १०४७ दलघमी आहे. दरम्यान,सद्यस्थितीत ८९४ दलघमी जलसाठा उपलब्ध आहे. त्याची सरासरी ८५ टक्के आहे. गेल्या वर्षी हेच प्रमाण ७८ टक्के एवढेच होते. रब्बी हंगामात व उन्हाळ्यातील पाणीपुरवठा याकरिता सिंचन प्रकल्पातील जलसाठ्याचा उपयोग होतो. यंदाही पुरेशा प्रमाणातजलसाठा असल्याचे रब्बी हंगामास सिंचनासाठी पाच पाळ्या देण्याची सुविधा जलसंपदा विभागाने केली आहे. जिल्ह्यात सर्वांत मोठा अप्पर वर्धा सिंचन प्रकल्प आहे. यामध्ये ९३ टक्के जलसाठा आहे. या प्रकल्पामधून रब्बी हंगामातील सर्वाधिक क्षेत्र सिंचनाखाली आहे. या प्रकल्पातून अमरावतीसह बडनेरा, मोशी, वरुड व अन्य गावांना पिण्याचा पाणीपुरवठा केला जातो. याशिवाय पिकांना पाणीपुरवठा केला जातो. यावर्षी रब्बी हंगामातील गहू, हरभरा या पिकांना पाच पाळमध्ये सिंचनासाठी पाणीपुरवठा केला जाणार आहे. सात मध्यम प्रकल्पांत सद्यस्थितीत १७७ दलघमी (६९ टक्के) व ४८ लघु प्रकल्पांत १८८ दलघमी (८२ टक्के) साठा आजघडीला उपलब्ध आहे. रब्बी हंगामात हरभरा व गहू या पिकांची पेरणी होते. शेतकऱ्यांनी रब्बी हंगामातील पिकांसाठी लागणाऱ्या पाण्यासाठी त्यासाठी मागणी करण्याचे आवाहन केले आहे.



### प्रकल्पातील जलसाठा

| जलसाठा | टक्केवारी |
|---|---|
| अप्पर वर्धा | ५२८-९३ |
| ७ मध्यम | १७७-६९ |
| ४ लघु | १८८-८२ |

# पाण्याची टाकी अंगावर कोसळून एकाचा मृत्यू

## जीर्ण टाकी पाडत असताना घडला अपघात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५वरुड–** तालुक्यातील वडाळा येथे जीर्ण झालेली पाण्याची टाकी पाडत असतांना टाकी अचानक कोसळल्याने त्याखाली दबून एका ३० वर्षीय मजुराचा मृत्यू झाल्याची घटना आज दुपारी ४ वाजताचे सुमारास घडली.

प्राप्त माहितीनुसार, बेनोडा (शहीद) पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या वडाळा गावात गावाला पाणीपुरवठा करण्यासाठी असलेली पाण्याची टाकी जीर्ण झाली होती. त्यामुळे काही दिवसापूर्वी गावात नवीन पाण्याची टाकी बांधण्यात आली होती. परंतु जुनी टाकी पाडण्यात आली नव्हती. त्या ठिकाणी असलेली जुनी पाण्याची टाकी हि जीर्ण झाल्याने व आता नवीन जळकुंभ निर्माण झाल्याने त्या टाकीपासून अपघात होऊ नये म्हणुन ती जीर्ण झालेली जुनी टाकी पाडण्याचे काम अमरावती येथील कंत्राटदाराला दिले होते. आज (ता.४) ही जीर्ण झालेली पाण्याची टाकी पाडण्यासाठी कंत्राटदाराने ४ मजूर कामावर बोलविले होते. त्यात आकाश नत्थुजी लोही हा आपल्या वडिलांसह काम करीत होता. त्यांनी टाकी पाडण्याचे

काम सुरु केले. टाकीच्या एका बाजुने व्हायब्रेटरच्या सहाय्याने टाकी पाडण्याचे काम सुरु असतांना अचानक ती टाकी येऊन कोसळल्याने त्या टाकी खाली आकाश नथ्थुजी लोही (३०) रा. मोर्शी याचा टाकीच्या मलब्याखाली दबून घटनास्थळीच मृत्यू झाला. दैव बलवंत्तर म्हणुन इतर तिघांना दुखापत झाली नाही. ही वार्ता गावात पसरताच नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. या घटनेची माहिती बेनोडा (शहीद) पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी पोहचून घटनास्थळाचा पंचनामा केला व जेसीबीच्या सहाय्याने त्या टाकीचा मलबा उचलुन मृतदेह बाहेर काढून वरुड ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. या प्रकरणी बेनोडा (शहीद) पोलीस पुढील तपास करीत आहे

# देवेंद्र लहानपणापासून खोडकर; पण...
# मोठी बहीण स्वाती फडणवीस साठे यांचा आठवणींना उजाळा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५नागपूर**

लहानपणी अतिशय खोडकर, एकमेकांच्या खोड्या करणारा, घरात बहीण भावासोबत मस्ती करणारा आणि तितकाच शांत आणि संवेदनशील मनाचा माझा भाऊ देवेंद्र फडणवीस पुन्हा एकदा मुख्यमंत्री पदाची शपथ घेणार आहे.त्यामुळे त्याची मोठी बहीण म्हणून खूप आनंद आहे. पूर्वी जसा आम्हाला वेळ देत होता तसा आता परिवाराला वेळ देत नसला तरी कुठलाही पारिवारिक कार्यक्रम असला की आम्ही त्याला बोलवत असतो आणि राजकारण सोडून अन्य विषयावर गप्पा मारतो.देवेंद्र फडणवीस यांची मोठी बहीण स्वाती फडणवीस साठे बोलत होती.

राज्याचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस तिसऱ्यांदा शपथ घेत असताना त्यांची पांडे ले आऊट येथे राहणारी मोठी बहीण स्वाती फडणवीस -साठे यांच्याशी संवाद साधला असता त्यांनी सांगितले, २०१४ मध्ये पहिल्यांदा मुख्यमंत्री झाला त्यावेळी आम्ही सर्व मुंबईला शपथविधी सोहळ्याला गेलो होता. त्यावेळी त्याने एक दिवस परिवारासाठी ठेवला होता. पुन्हा मुख्यमंत्री म्हणून शपथ घेत असताना मोठी बहीण म्हणून मला खूप आनंद आहे.

माझ्यापेक्षा तो तीन वर्षानी लहान आहे. रक्षाबंधन असो भाऊबीज असो तो हमखास वेळ मिळेल तसा नागपूरला येत असतो. विशेषत: दिवाळीला भाऊबीज किंवा पाडव्याला फडणवीस कुटुंब एकत्र येत असताना त्यावेळी त्याला औक्षवण करत असतो. त्यावेळी अनेक लोक त्याला भेटायला येत असतात मात्र आजचा दिवस केवळ कुटुंबासाठी म्हणून तो फारसा कोणाला भेट नाही. राजकारण सोडून तो आमच्यासोबत गप्पा मारतो. वेगवेगळे किस्से सांगत असतो. खूप मजा करत असतो. सगळ्या लाडक्या बहिणीने त्याला मत दिले आहे,

त्यामुळे आमच्यासह राज्यातील सगळ्या बहिणी आनंदात आहे, सुरुवातीपासून तो मेहनती आहे. अभ्यासात हुशार आहे. त्यामुळे त्याची मेहनत सार्थकी लागली आहे. देवेंद्र वडिलांना खूप घाबरत होता. त्यांना कुठलीही गोष्ट सांगितल्याशिवाय तो करत नव्हता. त्याचा स्वभाव आनंदी आणि कधीही त्याच्या चेहऱ्यावर तणाव दिसत नाही. २०१४ नंतर नंतर त्याला कुटुंबियांसाठी नक्कीच वेळ कमी पडतो. पहिले तो कार्यकर्ता म्हणून समाजासाठी काम करतो आणि त्यानंतर मात्र कुटुंब त्याच्यासाठी असल्यामुळे वेळ मिळेल तेव्हा तो आमच्याशी गप्पा मारतो आणि घरी येतो.

विशेषत: राखी आणि भाऊबीज या निमित्ताने आमची भेट होते पण कधीतरी त्याला निवांत असेल तो आम्हाला बोलावतो. भाऊ बहीण एकत्र जमलो की तो गमती स्वभावाचा असल्यामुळे मजेशीर घटनाचे अनेक किस्से त्यामुळे सगळे कुटुंब आम्ही हासत असतो. तसा तर तो अनेकदा बिनधास्त राहत होता. महाविद्यालयात शिकत असताना कधीही मित्रासोबत घरी न सांगता निघून जात होता मग कुठे गेला अशी त्याच्या मित्रांना विचारपूस केली तर बाहेरगावी गेल्याचे सांगत होते. एक दिवस तर मित्राना घेऊन तर अयोध्येला गेला होता. त्यानंतर जम्मु काश्मीरला आंदोलन सुरू असताना गेला होता. तेथे गेल्यावर गेल्यानंतर तो फोन करुन सांगत होता मी या ठिकाणी आहे. लहानपणापासून खोडकरपणा स्वभाव असलेला देवेंद्र परिवारात असला की आजही तसाच असतो.

# हरभऱ्याची भाजी ठरतेय आरोग्यासाठी उपयुक्त

## भाजी खुडण्यासाठी अनेक जण शेतात : बाजारातही आली विक्रीला



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अचलपूर**

सध्या बाजारात हरभऱ्याची भाजी विक्रीसाठी आली आहे. अनेक खवय्ये हरभऱ्याची भाजी खरेदी करीत असल्याचे दिसत आहे. तर काही जण स्वतःच्या किंवा परिचयातील इतरांच्या शेतात थेट जाऊन भाजी खुडून आणत आहेत.

हरभऱ्याचे पान तुरट, आंबट असते. हिवाळ्याच्या दिवसात विशेषतः डिसेंबर महिन्याच्या पहिल्या काही दिवसात ही भाजी उपलब्ध होते.

हरभऱ्याच्या हिरव्या भाजीला इंग्रजीत 'चौकपी लिव्हज' असे म्हणतात. हिवाळ्यात तापमानात घट होत असताना, त्याचा शरीरावरही परिणाम होत असतो. हरभऱ्याच्या पानांमध्ये कॅल्शियम, फॉस्फरस,कॉपर आदी मायक्रोन्यूट्रियन्स आढळतात, ज्यामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढते. सध्या हरभऱ्याच्या भाजीची आवक कमी असली तरी डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात आवक वाढणार आहे.या भाजीचे नियमित सेवन केल्याने कोलेस्टेरॉल नियंत्रित राहते. जे हृदयाच्या आजाराचा बचाव करते. यामध्ये अधिक प्रमाणात पोटॅशियम असल्यामुळे रक्तदाब नियंत्रित राहतो. कॉपर व झिंकमुळे त्वचेची चमक वाढते. भाजीतील आयर्न हे रक्ताच्या कमतरतेपासून बचाव करते. तसेच मधुमेहापासून ते त्वचेच्या अनेक समस्यांपासून सुटका मिळवण्यासाठी ही भाजी खूप फायदेशीर ठरते.

### मिनरल्स, फायबरचा समावेश

या भाजीत खूप मोठ्या प्रमाणात मिनरल्स व पॉवरफुल प्रोटीन ऑक्सिडन्स असतात. आरोग्याच्या अनेक तक्रारीवर मात करता येते. भाजीत डायटरी फायबर अधिक असल्याने शरीरातील शुगर लेवल नियंत्रित राहते. या कारणामुळे मधुमेहात याचा उपयोग होतो. हरभऱ्याची भाजी जास्त मुगाच्या डाळीसोबत तयार करावी. जर कोणाला भाजीमुळे पित्त होत असेल तर पित्त होणार नाही, असा सल्ला आरोग्य तज्ज्ञाकडून दिला जातो.

### वातावरण पोषक

जिल्ह्यात काही भागामध्ये हरभऱ्याची पेरणी केली जाते. सध्या हरभऱ्याचे पीक जोमाने वाढले आहे. सर्वत्र हरभरा पिकाला पाणी देण्याची कामे सुरू आहेत. दरम्यान, कडाक्याची थंडी हरभऱ्यासाठी पोषक मानली जाते. जेवढी थंडी अधिक तेवढे हरभऱ्याचे पीक जोमाने बहरते. या वातावरणात हरभऱ्याची भाजी खाणे देखील लाभदायक ठरते.

# जिल्हा सामान्य रुग्णालयात रुग्ण मुलीचा विनयभंग

## आरोपीला अटक नागरिकांनी दिला चोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार घेत असलेल्या एका रुग्ण मुलीचा दारूड्या तरुणाने विनयभंग केला. हा प्रकार मुलीच्या आईच्या लक्षात आल्यावर त्यांनी नागरिकांच्या मदतीने सदर तरुणाला पकडले. नागरिकांनी त्याला चोप देऊन कोतवाली पोलिसांच्या स्वाधीन केले. ही घटना बुधवार, ४ डिसेंबर रोजी दुपारी १२.३० वाजताच्या सुमारास घडली.

शेख मतीन शेख अजीज (३३) रा. लालखडी असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पीडित १२ वर्षीय मुलीची प्रकृती बरी नसल्याने कुटुंबीयांनी तिला उपचाराकरिता जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले होते.तिच्या देखरेखीकरिता तिची




आई व भाऊ सोबत होते. बुधवारी दुपारी तिच्या भावाला बरे वाटत नसल्याने आई त्याला घेऊन डॉक्टरांना दाखवायला गेली. त्यामुळे पीडित मुलगी ही आपल्या बेडवर एकटीच होती. त्यावेळी शेख मतीन हा तिच्याजवळ गेला. त्याने तिच्याशी असभ्य वर्तन करून तिचा विनयभंग केला.या प्रकाराने घाबरलेली पीडित मुलगी ओरडली. त्यावर शेख मतीनने तेथून पळ काढला. त्यानंतर पीडित मुलीने अन्य एका रुग्णाच्या मोबाइलवरून आईला कॉल करून या घटनेबाबत माहिती दिली. त्यामुळे तिची आई तातडीने त्या वॉर्डात परतली. मुलीने आपबिती सांगितल्यावर आईने नागरिकांच्या मदतीने शेख मतीनचा शोध घेऊन त्याला पकडले. नागरिकांनी त्याला चोप देऊन कोतवाली पोलिसांच्या स्वाधीन केले. या प्रकरणी पोलिसांनी शेख मतीनविरुद्ध विनयभंग व बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करून त्याला अटक केली.

# आदिवासी क्षेत्रातील रस्त्यांकरिता २२ कोटींचा आराखडा तयार

## ६६ कामांचा समावेश : प्रशासकीय मान्यतेकरिता सीईओंकडे प्रस्ताव दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती :**

मेळघाट या आदिवासी क्षेत्रातील रस्त्यांच्या कामांकरिता २२ कोटी २० लाखांचा आराखडा तयार करण्यात आला आहे. यामध्ये ग्रामीण, जिल्हा व इतर जिल्हा मार्ग आदी ६६ रस्त्यांचा समावेश आहे. निवडणुकीमुळे रखडलेल्या या कामांना आता गती आली असून या कामांचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेकरिता सीईओंकडे सादर करण्यात आला आहे. त्यामुळे प्रशासकीय मान्यतेनंतर लगेच निविदा प्रक्रिया आणि कामांना सुरुवात होईल.

जिल्ह्यात सन २०२४- २५ या आर्थिक वर्षात मार्च एण्डिंगनंतर लोकसभा आणि पाच महिन्यांतच पुन्हा विधानसभा निवडणुका लागल्या. त्यामुळे या वर्षातील कोट्यवधींचे नियोजन, प्रशासकीय मान्यता आणि निविदा प्रक्रिया रखडली होती. परंतु, आता निवडणुकांची आचारसंहिता हटताच जिल्हा परिषदेमध्ये कामांना गती आली आहे. अशातच आदिवासी क्षेत्र असलेल्या जिल्ह्यातील धारणी, चिखलदरा या दोन तालुक्यांसह अचलपूर आणि वरूडमधील काही भागातील रस्त्यांकरिता आदिवासी प्रकल्प कार्यालयाकडून रस्ते बांधकामाकरिता नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये ग्रामीण रस्त्यांची २१ कामे मंजूर असून याकरिता ७ कोटी ४७ लाखांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच याच शिर्षांत १० कामांकरिता १ कोटी ९४ लाख, इतर जिल्हा मार्गाकरिता ४ कामे २ कोटी ६१ लाखांचे नियोजन, जिल्हा मार्गाकरिता १७ कामे ९ कोटी ८१ लाख तसेच अचलपूर आणि वरूडकरिता म्हाडा मिनी म्हाडा शिर्षात ९८ लाख रुपयांचे नियोजन करण्यात आले आहे. असे एकूण ६६ कामांकरिता २२ कोटी २० लाखांचा आराखडा तयार करण्यात आला असून या कामांना प्रशासकीय मंजुरीकरिता सीईओंकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.आगामी जिल्हा परिषदेची निवडणूक बघता त्यापूर्वीच या कामांना गती देण्याचे नियोजन बांधकाम विभागाकडून करण्यात आले आहे.

# शेगाव नगर पालिकेने राबवली शहरात अतिक्रमण हटाव मोहीम

## भाविकांकडून शेगाव नगर पालिकेच्या कारवाईचे स्वागत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५शेगाव**

शेगाव नगर पालिकेने आज ४ डिसेंबर रोजी राबवलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेमुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकापासून लहुजी वस्ताद चौकापर्यंतचा मार्ग अतिक्रमणमुक्त झाला आहे. श्री गजानन महाराजांच्या मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांकडून या कारवाईचे स्वागत करण्यात येत आहे. या परिसरात नेहमीची गर्दी आणि वाहतुकीतील अडथळे दूर झाल्याने भाविकांनी समाधान व्यक्त केले आहे.

येथील श्रीं चे मंदिर लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असल्यामुळे शहरात दररोज मोठ्या प्रमाणावर भाविकांची वर्दळ असते. परंतु रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या अतिक्रमणांमुळे वाहतूक कोंडी, पादचाऱ्यांना होणारा त्रास आणि अस्वच्छता या समस्यांचा भाविकांना सामना करावा लागत होता. त्यामुळे अनेक वेळा पालीका प्रशासनाकडे तक्रारी दाखल करण्यात आल्या होत्या. अखेर पालिका प्रशासनाने ठोस पाऊल उचलत या भागातील अतिक्रमणे काढून टाकली आहेत.

या कारवाईचे भाविकांनी स्वागत करत, हा परिसर कायमस्वरूपी अतिक्रमणमुक्त राहण्यासाठी पालिका प्रशासन व पोलिस विभागाने सातत्याने लक्ष ठेवण्याची मागणी केली आहे. रस्त्याच्या बाजूचे अतिक्रमण काढण्यात आल्यामुळे वाहतुकीस गती मिळाली असून रस्ते मोकळे झाल्याने वाहतूक सुरळीत झाली आहे. तसेच दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना आता कोणत्याही अडचणी शिवाय मंदिरात प्रवेश करता येणार आहे.

# डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालयात ए.आय.यु. क्रिकेट निवड चाचणी स्पर्धेला सुरूवात



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती :**

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी सन २०२४-२५ मध्ये संपन्न होणाऱ्या विद्यापीठ क्रीडा महोत्सव व अखिल भारतीय विद्यापीठ संघ क्रीडा स्पर्धासाठी क्रिकेट या क्रीडा प्रकाराच्या स्पर्धेसाठीची निवड चाचणी आयोजनाची जबाबदारी विद्यापीठाकडून डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालयाकडे सोपविण्यात आली आहे. सदर खेळाची निवड चाचणी दिनांक ०५ व ०६ डिसेंबर २०२४ या कालावधीत संपन्न होणार आहे. त्याअनुषंगाने महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांचे अध्यक्षतेखाली तसेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ विद्यापरिषद सदस्य डॉ. राजेश गोंधळेकर, सहाय्यक कुलसचिव, विद्यापीठ शैक्षणिक कक्ष राजेंद्र शहाणे, वैद्यकीय सामाजीक कार्यकर्ता श्री बाळासाहेब पेंढारकर, वरिष्ठ सहाय्यक समाधान जाधव तसेच सीएसएमएस औरंगाबाद येथील डॉ. प्रवीण बनसोड, सिलेक्टर संदीप गावंडे, राहुल वानखडे, डॉ. अजय जावरकर, डॉ. वसंत लुंगे, डॉ. विनोद वासनिक,डॉ. प्रसाद तोरकडी, डॉ. प्रकाश कुटे, डॉ. स्वप्निल मोहोड, क्रिडा संचालक संजय वाटाणे यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन सोहळा डॉ. पंजाबराव देशमुख क्रिकेट मैदानावर संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अनिल देशमुख, डॉ. राजेश गोंधळेकर, डॉ. राजेंद्र शहाणे, समाधान जाधव यांनी क्रिकेट निवड चाचणी स्पर्धेकरीता उपस्थित खेळाडूंना मार्गदर्शन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या, कार्यक्रमाचे सुरूवातीला शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेचे पुजण, हारार्पण व दिपप्रज्वलन करण्यात आले. तसेच क्रीडा मैदानाचे पुजण व नारळ फोडून रितसर उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन स्वीयसहाय्यक किशोर इंगळे यांनी केले तर मान्यवर व उपस्थितांचे आभार क्रिडा अधिकारी संजय वाटाणे यांनी मानले.

# अमरावती जिल्ह्याचा सर्वांगीण विकास अत्यंत गतिमान होणार : आ. रवी राणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**



विदर्भाचे सुपुत्र महाराष्ट्राचे जाणते लोकप्रिय नेते देवेंद्र फडणवीस पुन्हा एकदा मुख्यमंत्री पदी विराजमान होणार आहे. हे महाराष्ट्राच्या स्वर्णिम युगाची नविन सुरुवात म्हणावी लागेल. फडणवीस यांच्या नेतृत्वात अमरावती जिल्ह्याचा सर्वांगीण विकास अत्यंत गतिमान होणार. हे काळा दगडावरची पांढरी रेष आहे. असे वक्तव्य महायुती समर्थितराष्ट्रीय युवा स्वाभिमान पक्षाचे सलग चौथ्यांदा रेकॉर्ड मताने निवडून आलेले आमदार रवी राणा यांनी व्यक्त केले आहे. त्यांनी विश्वास व्यक्त केला की, अमरावती जिल्ह्यातील सर्व प्रलंबित प्रकल्प बेलोरा एअरपोर्ट, पीएम मित्रा मेगा टेक्सटाइल प्रकल्प, चिखलदरा येथील स्कायवॉक समवेत सर्व विकास प्रकल्प आता ताबडतोब पूर्ण होणार. जिल्ह्यातील सिंचन क्षमता देखील वाढणार. संपूर्ण रखडले प्रकल्प पूर्णत्वास नेले जाणार. अमरावती जिल्ह्याचा संपूर्ण कायापालट होणार. देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली खासदार डॉ अनिल बोंडे आणि माजी खासदार नवनीत रवी राणा यांनी विधानसभा निवडणुकीत संपूर्ण अमरावती जिल्हा कांग्रेस मुक्त केला आहे.

# म्हणून ते पुन्हा येईन, असे म्हणाले होते, अमृता फडणवीसांनी सांगितला 'त्या' घोषणेचा अर्थ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५मुंबई**

महायुतीला विधानसभा निवडणुकीत बहुमत प्राप्त झाल्यानंतर आज महायुतीचा शपथविधी सोहळा पार पडत आहे. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्रीपदाची तर अजित पवार आणि एकनाथ शिंदे हे उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार आहेत. या पार्श्वभूमीवर देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधताना ही घटना त्यांच्यासाठी किती महत्त्वाची आहे, याबद्दल माहिती दिली. तसेच फडणवीस मुख्यमंत्री झाल्यानंतर पहिला निर्णय कोणता घेणार? याबद्दल प्रश्न विचारला असता त्याचेही त्यांनी समर्पक उत्तर दिले.

अमृता फडणवीस म्हणाल्या, देवेंद्र फडणवीस सहाव्यांदा आमदार झाले आणि तिसऱ्यांदा मुख्यमंत्री होत आहेत, याबद्दल खूप आनंद वाटतो. पण आनंदापेक्षा एका जबाबदारीची आम्हाला जाणीव आहे. त्यांच्या मेहनतीला यश मिळाले. महायुती आता एकत्र आहे आणि महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी कायम एकत्र राहिल. त्यांचे जीवन संघर्षपूर्ण राहिलेले आहे. मी हे जवळून पाहिले आहे. जिद्द, चिकाटी आणि संयम या गुणांमुळेच ते आज इथवर पोहोचले आहेत. संयम हा त्यांचा सर्वोच्च असा गुण आहे.

**म्हणून ते पुन्हा येईन म्हणाले होते**

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीआधी देवेंद्र फडणवीस 'मी पुन्हा येईन' असे म्हणाले होते. यावरून फडणवीस यांना बरेच ट्रोल करण्यात आले. आता ते खरोखर पुन्हा आले आहेत, यावर बोलताना त्या म्हणाल्या, जेव्हा आपल्याला काही साध्य करायचे असते. तेव्हा अर्जुनासारखे केवळ लक्ष्य असले पाहीजे. त्यांना पुन्हा खुर्चीसाठी यायचे नव्हते. त्यांना पुन्हा यासाठी यायचे होते कारण त्यांना विश्वास होता की, ते महाराष्ट्रासाठी जे काही करू शकतात, ते इतर कुणी करू शकत नाही. या विश्वासासाठी ते पुन्हा आलेले आहेत, याचा मला आनंद वाटतो.

# मनुका पाचशे अन् लसूण चारशे ; रोज फिक्के वरण खाणार काय?

## वरणाला लसणाचा तडका बंद; महिला घेत आहेत हात आखडता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ मोर्शी**

रोजच्या स्वयंपाकातील वरणाला लसणाची फोडणी हवीच असते. मात्र, सद्यःस्थितीत लसणाला सुक्या मेव्याचा भाव आला आहे. त्यामुळे लसणाची फोडणीच चांगलीच महागली असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे महिलांनी हात आखडता घेतला आहे.

प्रत्येकाच्या जेवणात वरण असतेचआणि त्या वरणाला चवदार बनविण्यासाठी लसणाची फोडणी दिली जाते. लसूण हे आरोग्यासाठी फायदेशीर असल्याचे आयुर्वेदात म्हटले आहे. मात्र, मागील काही दिवसांपासून लसणाच्या दरात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. चारशे रुपयांच्या पार लसणाचे दर पोहोचले आहेत. त्यामुळे



वरणाला लसणाची फोडणी देताना महिला हात आखडता घेत आहेत, तर अनेक जण विना लसणाचे फिक्के वरणच बनवत असल्याचे दिसून येत आहे. हॉटेलमध्येही लसूण गायब झाले आहेत.मसाल्यामध्ये खाकस, भेंडी विलायची, कलमी, -सहजिरा, छडेला आदी वस्तू गरजेच्या असतात. मात्र, या सर्वच वस्तूचे दर हे गगणाला भिडले आहेत. केवळ भाजीत टाकायचे मीठच स्वस्त आहे.

**फोडणीच्या नावाने डोक्यात तडतड !**

लसणाचे सततचे वाढते दर बघून लसणाची फोडणी म्हटले तर महिलांच्या डोक्यात तडतड होत असल्याचे दिसून येत आहे.

**लसणाची पाकळी ड्रायफूटला भारी**

चांगल्या प्रतीचा लसूण ४०० रुपये किलो, तर पाकळी ही ३६० रुपये किलो आहे. हा दर ड्रायफूटपेक्षाही महाग आहे.

# साहित्य संमेलनाच्या मंचावर मोदी-पवार एकत्र ?

## ७० वर्षांपूर्वीच्या प्रसंगाच्या पुनरावृत्तीचा आयोजकांचा प्रयत्न

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि. ५ नवी दिल्ली**

दिल्ली येथे सात दशकांनी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होत आहे. या संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी ज्येष्ठ नेते शरद पवार यांची नुकतीच निवड करण्यात आली. आता संमेलनाच्या उद्घाटनासाठी पंतप्रधान मोदी यांना निमंत्रित करण्याचा विचार आयोजकांकडून सुरू आहे.

३ ऑक्टोबर रोजी केंद्र सरकारने मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिला. या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांना संमेलनाच्या उद्घाटनासाठी बोलवावे, शरद पवार स्वागताध्यक्ष असतील तर संमेलनाच्या मंचावर ‘राजकीय संतुलन’ साधण्यासाठी उद्घाटक म्हणून पंतप्रधानच हवेत, अशी आग्रही मागणी साहित्य महामंडळाकडून करण्यात आल्याची चर्चा आहे. महामंडळाकडून तसे संकेतही आयोजक संस्थेला देण्यात आल्याचे कळते. आयोजक संस्थेनेही पंतप्रधानांना निमंत्रण देण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत.

यापूर्वी १९५४ मध्ये दिल्लीत झालेल्या साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष तत्कालीन केंद्रीय मंत्री काकासाहेब गाडगीळ होते. त्यावेळी पहिले पंतप्रधान पंडित जव



संमेलनाचे उद्घाटन झाले होते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे संमेलनानंतरच संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला बळ मिळाले आणि १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली.

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा, यासाठी काँग्रेसच्या कार्यकाळात अनेकदा प्रयत्न झाले. तरीही मराठीला अभिजात दर्जा मिळाला नाही. मोदींच्या सरकारने मात्र तो दिला. अभिजात दर्जा मिळाल्यानंतरचे हे पहिलेच संमेलन आहे. त्यामुळे मोदींना या संमेलनात सन्मानाने बोलावले जावे, यासाठी साहित्य महामंडळातील काहींचा आग्रह आहे. संमेलनाला राजकीय स्वरूप नको असलेल्या आयोजक संस्थेतील काहींना मात्र हा आग्रह पटलेला नाही. परंतु, स्वागताध्यक्षपदी शरद पवार हे राजकीय नेते असल्याने मोदींच्या नावाचा विरोध कोणत्या तोंडाने करायचा, असा प्रश्न आयोजकांपैकी काहींना पडल्याचे कळते.

संमेलनाच्या उद्घाटकाचे नाव अद्याप ठरले नाही. पंतप्रधानांना उद्घाटनासाठी निमंत्रित करावे, असा विचार सुरू आहे. परंतु, पंतप्रधानांच्या सुरक्षा व्यवस्थेमुळे संमेलनस्थळी निर्माण होणारे प्रश्न व संमेलनाच्या मंचावर महामंडळाच्या शिष्टाचारानुसार बैठक व्यवस्थेत करावे लागणारे बदल, या सर्व बाबींवरही विचार केला जात आहे.

### शहरी आरोग्य केंद्र अंतर्गत शाळेत राष्ट्रीय जंतनाशक दिवशी

## मुलांना जंतनाशक औषध चे वाटप




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ अमरावती** – राष्ट्रीय जंतनाशक दिवस देशामध्ये ४ डिसेंबर ला साजरा करण्यात येतो त्या निमित्ताने शहरी आरोग्य केंद्र पठाण चौक व आयसोलेशन तसेच सर्व १३ शहरी आरोग्य केंद्राच्या अंतर्गत येत असलेल्या सर्व महानगर पालिकेच्या मराठी शाळा,उर्दू शाळा , हिंदी शाळा, सेमी इंग्लिश शाळा , खाजगी शाळा ,अंगणवाडी, प्राथमिक शाळा ह्या ठिकाणी वय १ ते १९ वयोगटातील मुला – मुलींना डॉक्टर्स , आरोग्य सेवक,आरोग्य सेविका , आशा यांच्या माध्यमातून प्रत्यक्ष देण्यात येते अमरावती महानगर पालिकेचे अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या मुख्य उपस्थितीत असोसिएशन उर्दू गर्ल्स हायस्कूल तसेच महानगरपालिका हिंदी प्राथमिक व माध्यमिक शाळा पठाणपुरा, आयसोलेशन अंतर्गत नारांदास लड्ढा हायस्कूल येथे माननीय श्रीमती शिल्पा नाईक, अतिरिक्त आयुक्त मनपा अमरावती, मा. श्री प्रकाश मेश्राम शिक्षण अधिकारी मनपा अमरावती, मा. डॉ विशाल काळे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी मनपा अमरावती, मा. डॉ.रुपेश खडसे साथरोग नियत्रंण अधिकारी मनपा अमरावती तसेच शहरी आरोग्य केंद्र पठाण चौक येथील डॉ. निगाार खान स्त्री वैद्यकीय अधिकारी ,डॉ. अश्विनी खडसे स्त्री वैद्यकीय अधिकारी आयासोलेशन यांचे पुष्पगुच्छ देवून शाळेतील प्राचार्य व शिक्षक वृंद यांनी स्वागत केले. तसेच वरील मान्यवरांनी शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींना राष्ट्रीय जंतनाशक दिवसानिमित्त जंतनाशक गोळी खाण्याचे महत्त्व सांगितले . हात स्वच्छ धुवून कोणतेही अन्न घेतले पाहिजे , जंतमुळे होणारे आजार विशेष म्हणजे हिमोग्लोबिन कमी होणे , पोट दुखणे शरीराची वाढ न होते पोटातील आजार निर्माण होणे , व इतर आजार होणे असे मार्गदर्शन डॉ विशाल काळे आरोग्य अधिकारी यांनी केले तसेच आपले आरोग्य आपण कसे निरोगी ठेवाल याबद्दल योग्य मार्गदर्शन डॉ .रुपेश खडसे साथ रोग नियंत्रण अधिकारी यांनी केले. स्वतः शिल्पा नाईक अतिरिक्त आयुक्त यांनी त्यांच्या पालकांसमोर व सर्व शाळेतील कर्मचारीसमोर जंत नाशक औषध मुलांना खाऊ घातली व मुलींच्या व मुलांच्या पालकांना मार्गदर्शन केले.तसेच ज्या मुला – मुलींना आज औषध देऊ शकलो नाही त्यांना पुढील १० तारखेला पालकांनी शाळेत आणून देण्याचे आदेश देण्यात आले यावेळी शाळेतील सर्व शिक्षक वृंद, शहरी आरोग्य केंद्र पठाण चौक येथील सार्वजनिक आरोग्य परिचारिका श्रीमती संगीता फुंडे, श्रीमती सुशीला दामले आरोग्य सेविका, आरोग्य सेवक डी एम बरडे , शाहरुख पठाण ,प्रयोगशाळ ा वैज्ञानिक अधिकारी ,प्रशांत ढोके,औषध निर्माण अधिकारी ,वैशाली बुरणासे ,वैशाली निमकर ,मीनल राऊत ,दीपा खिराळे व आशाउपस्थित होत्या।

# शेवटच्या बाकावर बसणारा विद्यार्थी आता मुख्यमंत्री होणार

## देवेंद्र फडणवीसांच्या शिक्षिकेने सांगितल्या शाळेतील गंमती जमती!

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि. ५ नागपुर–** भाजपाचे तरुण तडफदार नेते देवेंद्र फडणवीस यांची विधिमंडळ गटनेतेपदी वर्णी लागली आहे. ते आज होणाऱ्या शपथविधीत मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार आहेत. ते राज्याचे २१ वे मुख्यमंत्री असणार असून आतापर्यंत त्यांनी तीनवेळा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली आहे. तसंच, विदर्भातील ते चौथे मुख्यमंत्री ठरले आहेत. दरम्यान, शाळेत मृदूभाषी असलेले देवेंद्र फडणवीस पुढे जाऊन राजकारणात शिरतील असं त्यांच्या शिक्षकांनाही वाटलं नव्हतं. तसंच, शेवटच्या बाकावर बसलेला विद्यार्थी राज्याच्या महत्त्वाच्या खूर्चीवर विराजमान होत असल्याने त्यांच्या शाळेतील शिक्षकांनी आनंद आणि अभिमान व्यक्त केला आहे.

देवेंद्र फडणवीसांचं प्राथमिक शिक्षण शंकरनगरातील सरस्वती विद्यालयात झालं आहे. ते शाळेत शेवटच्या बाकावर बसायचे. पण यामागेही त्यांची सामाजिक वृत्तीच होती. त्यांच्या भारदस्त शरीरयष्टीमुळे मागच्या विद्यार्थ्यांना फळ्यावरचं नीट दिसावं याकरता ते स्वतः मागच्या बाकावर बसायचे असं त्यांच्या शिक्षिका म्हणाल्या. शिक्षिका पुष्पा नारायण म्हणाल्या, देवेंद्र फडणवीस याच बाकावर बसायचे. तेव्हाही त्यांची शररीयष्टी अशीच डायनॅमिक होती. तेव्हाही ते थोडे उंच आणि भारदस्त होते. तेव्हापासूनच ते सामाजिक विचार करत होते. माझ्यामुळे कोणाला अडचण येऊ नये म्हणून ते मागे जाऊन बसायचे. शेवटच्या बाकावर बसणारा विद्यार्थी कधी पुढे जात नाही ही कल्पनाही त्यांनी मागे टाकली., देवेंद्र फडणवीस फार लाजाळू आणि मृदूभाषिक होते. ते फार कमी बोलत असत. त्यांना विचारलं तरच ते त्यांचं मत मांडत असतं. पण नक्कीच त्यांच्यात नेतृत्वगुण होते. बाकाला आत्मकथा लिहायला सांगितली तर ते नक्कीच फडणवीसांचा उल्लेख करतील, असंही त्या पुढे म्हणाल्या.



देवेंद्र फडणवीस यांचे शालेय मित्र मुकुल बऱ्हानपुरे यांनी सांगितले, नागपूरच्या शंकर नगर चौकावरील साउथ इंडियन एजुकेशन सोसायटीच्या सरस्वती विद्यालयात आम्ही देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत होतो. शाळेतील तळ मजल्यावरच्या वर्गात शेवटून दुसऱ्या बाकावर तो बसत होता. अभ्यासात मागे आहे म्हणून त्याना अखेरच्या बाकावर बसावे लागत नव्हते. तर लहानपणी देवेंद्र फडणवीस यांची उंची ही जास्त होती. इतर मुलांच्या तुलनेत ते जास्त उंच असल्याने त्यांना शेवटच्या बाकावर बसावे लागत होते.

शाळेत अत्यंत शांत, लाजाळू आणि कधी कधीच बोलणारे होते पण खोडकर होते. अभ्यासत हुशार होते मात्र मात्र नियमित अभ्यास करत नसल्यामुळे शाळेतील शिक्षक त्यांना रागावत होते पण दुसऱ्या दिवशी मित्राला विचारुन गृहपाठ पूर्ण करत होते. ते शाळेत एखाद्या विद्यार्थ्याची खोड काढायचे आणि त्यानंतर त्यांची तक्रार केल्यानंतर शाळेतील शिक्षिका त्यावर विश्वास ठेवत नव्हतच्या.

इतका साधा मुलगा खोडकर असून शकत नाही अशी शिक्षकांना सहानुभुती. त्याला समोसा आवडत होता. त्यामुळे शाळेच्या बाहेर असलेल्या प्रिती कॉर्नर येथे जाऊन त्यावेळी आम्ही सोबत जाऊन समोसा खात होते. शाळेत त्यांचा मोठा भाऊ आशिष होता त्यामुळे भावाचा त्याला धाक होता. त्यामुळे तो शाळेत जास्त मस्ती करत नव्हता मात्र विद्यार्थ्यांच्या खोड्या करत होत्या अशी आठवण त्यांनी सांगितली.

## कर्जाचा हप्ता कमी होणार का?

### रिझर्व्ह बँक व्याजदराबाबत काय निर्णय घेणार?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ५ मुंबई–** रिझर्व्ह बँकेच्या पत धोरण समितीची बैठक ४ ते ६ डिसेंबर दरम्यान होत आहे. एकीकडे महागाई वाढली असून वाढत्या महागाईमुळे कर्ज हप्त्यांचा भार देखील वाढत चालला आहे. अमेरिकी मध्यवर्ती बँक फेडरल रिझर्व्हने दोन महिन्यापूर्वी थेट अर्ध्या टक्क्याची व्याजदर कपात केल्यांनतर देशांतर्गत आघाडीवर रिझर्व्ह बँकेकडूनदेखील अपेक्षा वाढल्या आहेत. मात्र किरकोळ महागाई आणि घाऊक महागाई पुन्हा रिझर्व्ह बँकेच्या अपेक्षेविपरीत वर गेल्याने मध्यवर्ती बँक आता सामान्यांना दिलासा देणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.रिझर्व्ह बँकेच्या सहा सदस्यीय चलनविषयक धोरण समितीची बैठक ४ ते ६ डिसेंबर दरम्यान मुंबईत पार पडणार आहे. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांच्या नेतृत्वाखाली ही बैठक पार पडणार आहे. विद्यमान कॅलेंडर वर्षातील ही शेवटची बैठक असून भांडवली बाजारातील गुंतवणूकदारांसह कर्जदारांचे रिझर्व्ह बँकेच्या निर्णयाकडे लक्ष लागले आहे. कारण मध्यवर्ती बँक, ज्या व्याजदराने व्यावसायिक बँकांना कर्ज देते त्यासंबंधीचा महत्त्वाचा रेपोदर जाहीर केला जाणार आहे. अपेक्षेपेक्षा कमी सकल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) आकडेवारी, उच्च चलनवाढ आणि उत्पादनातील घसरण या आर्थिक आव्हानांसह ही बैठक पार पडणार आहे.

## अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बॉक्सिंग (पुरुष व महिला) स्पर्धेकरीता विद्यापीठाचे संघ घोषित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती –** गुरू काशी विद्यापीठ, भटिंडा (पंजाब) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बॉक्सिंग स्पर्धेकरीता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे महिला व पुरुष संघ घोषित करण्यात आले आहे.

**पुरुष संघ–** पुरुष संघाच्या स्पर्धा २६ डिसेंबर, २०२४ ते ०२ जानेवारी, २०२५ दरम्यान होणार असून चमूमध्ये श्री एस.एस.जी. आर्टस् अ‍ॅन्ड कॉमर्स कॉलेज, बोरगांव मंजूचा प्रशिक भालेराव, शिवाजी गेडाम, अमित ढबाले, विशाल नुपे, गौरव चव्हाण, मनिकुमार सिंह व शंतनु खाबळे, यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालय, मंगरूळपीरचा वैभव जरवाल, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अ‍ॅन्ड टेक्नॉलॉजी, अकोलाचा मोहंमद राहील, अकोला विधी महाविद्यालय, अकोलाचा केतन सरोदे, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोलाचा हर्ष संवाल, गुलामनबी आझाद महाविद्यालय, बार्शिटाकळीचा क्रिष्णा लोखंडे व आबासाहेब पारवेकर महाविद्यालय, यवतमाळचा ऋषिकेश भस्मे यांचा समावेश आहे.

**महिला संघ–** महिला संघाच्या स्पर्धा १८ ते २४ डिसेंबर, २०२४ दरम्यान होणार असून चमूमध्ये महात्मा फुले कला व विज्ञान महाविद्यालय, पातुरची कु. रुणाली डोंगरे, श्रीमती आर.डी.जी. महिला महाविद्यालय, अकोलाची कु. घनिशा ढेवा, बी.एस. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पिंपळगांव काळेची कु. जिज्ञासा जाधव, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावतीची कु. मुमुक्षा भालकर व कु. पुनम कैथवास, एस.एस.जी.एम. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, शेगांवची कु. जयश्री शेटऐ, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोलाची कु. गायत्री मेटे, कु. भक्ती ठाकरे, कु. विधी रावल व कु. प्रियंका खंडारे, मांगीलालजी शर्मा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोलाची कु. सिमरन गवई आणि श्री एस.एस.जी. आर्टस् अ‍ॅन्ड कॉमर्स कॉलेज, बोरगांव मंजूची कु. गौरी मुरुमकर हिचा समावेश आहे. निवड झालेल्या सर्व खेळाडूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे व कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे.

दोन्ही संघाचा प्रशिक्षण वर्ग जिल्हा क्रीडा कार्यालय, अकोला येथे होणार असून पुरुष संघाचा प्रशिक्षण वर्ग १३ ते २२ डिसेंबर, तर महिला संघाचा प्रशिक्षण वर्ग ०५ ते १४ डिसेंबर दरम्यान होणार आहे. प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे.

### जिल्हा युवा महोत्सवाचा शुभारंभ

## महोत्सवाच्या माध्यमातून स्थानिक युवकांच्या कलागुणांना वाव - जिल्हाधिकारी अजित कुंभार

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.अकोला,–** युवकांच्या अंगभूत कलागुणांना वाव देऊन त्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी युवा महोत्सवाचा उपक्रम उपयुक्त आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज येथे केले.

श्री शिवाजी महाविद्यालयात जिल्हाधिकारी श्री. कुंभार यांच्या हस्ते जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे उदघाटन झाले, त्यावेळी ते बोलत होते.क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद व नेहरू युवा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात



आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर श्री रामेश्वर भिसे उपस्थित होते.

महोत्सवात चित्रकला, लोकगीत, लोकनृत्य, कविता, वक्तृत्व व कथालेखन आदी स्पर्धा झाल्या. संजय आगाशे, सुभाष धार्मिक, प्रा. हर्षवर्धन मानकर,

प्रा. डॉ नीरज लांडे, डॉ. सुशील वावरकर, डॉ. अर्चना भट्ट, प्रा. आकाश हराल, अशोक शिरसाठ, प्रा. संजय पोहरे, प्रा. संजय मोहोड,प्रा. आर. डी. चौधरी यांनी परीक्षण केले.

यावेळी विज्ञान प्रदर्शनाचे आयोजनही करण्यात आले. विविध शाळांच्या विद्यार्थ्यांनी त्यात प्रकल्प सादर केले.संयोजन व सूत्रसंचालन जिल्हा क्रीडा अधिकारी सतीश्चंद्र भट्ट यांनी केले. जिल्हा क्रीडा अधिकारी सतीशचंद्र भट, जिल्हा संघटक राजेश गावंडे, सुरज कुमारदुबे , निशांत वानखडे, अजिंक्य धेवढे, राजू उगवेकर, गजानन चाटसे, रसिका मेहेसरे तसेंच नेहरू युवा केंद्राचे सागर चौधरी, व इतर युवकांनी यांनी परिश्रम घेतले.

## कुमार महाराष्ट्र केसरी पैलवान विक्रम पारखींना हृदयविकाराचा झटका

### संसाराच्या आखाड्यात उतरण्याआधीच काळाचा घाला, मुळशीवर शोककळा

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.५मुळशी–** कुमार महाराष्ट्र केसरीसह राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय पातळीवर मुळशीचे नाव करणारा विक्रम पारखी यांचा हृदयविकाराच्या धक्क्याने मृत्यू झाला आहे. बुधावरी नेहमीप्रमाणे व्यायामाल गेलेले असतानाच त्यांना अचानक हृदयविकाराचा झटका आला आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला आहे. थोड्याच दिवसात विक्रम यांचे लग्न देखील होणार होते, मात्र त्याआधीच काळाने घाला घातला.

कुस्तीच्या आखाड्यात अनेक दिग्गजांना चितपट करणारा पैलवान हृदयविकाराने गेल्याने मुळशी येथे शोककळा पसरली आहे. मुळशी येथील माण गावात विक्रम यांनी कसरत करत



मेहनत घेत कुस्ती क्षेत्रात आपले नाव कमावले होते. येत्या १२ डिसेंबर रोजी विक्रम यांचा विवाह होणार होता. कुस्तीच्या आखाड्यात दंगल माजवणारा पैलवान गडी संसारच्या आखाड्यात उतरण्यापूर्वीच हारला. वयाच्या अवघ्या तिशीतच मृत्यू झाल्याने कुटुंबीयांना देखील मोठा धक्का बसला आहे.

विक्रम पारखी यांनी कुमार महाराष्ट्र केसरी पदावर आपले नाव कोरत मनांची गदा मिळवली होती. २०१४ साली महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद द्वारे आयोजित कात्रज येथे महाराष्ट्र राज्य कुमार अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेत विक्रम यांनी अजिंक्यपद पटकावले होते. याच सोबत विक्रम यांनी अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पदके व किताब मिळवले आहेत.

विक्रम पारखी हे हिंदकेसरी पैलवान अमोल बुचडे यांचे शिष्य होते. विक्रम यांचे वडील शिवाजीराव पारखी हे निवृत्त सैनिक असून त्यांनी १९९९ च्या कारगिल युद्धात लढा दिला आहे. विक्रम यांच्या जाण्यामुळे मुळशीसह कुस्ती जगतात देखील दुःख व्यक्त केले जात आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या नावे शपथविधीसह अनेक रेकॉर्ड, राज्याचे नवे मुख्यमंत्री म्हणून घेतली शपथ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५मुंबई**

राज्याचे नवे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी आज संध्याकाळी मुंबईतील आझाद मैदानावर शपथ घेतली या शपथविधीसह देवेंद्र फडणवीस यांच्या नावे अनेक रेकॉर्ड झाले आहेत. आजवर महाराष्ट्राचा कोणताच उपमुख्यमंत्री हा मुख्यमंत्री झाला नव्हता. तो पायंडा देवेंद्र फडणवीस मोडीत काढला आहे. तिसऱ्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेऊन फडणवीस हा नवा रेकॉर्ड केला आहे १९६० पासून ते आजपर्यंत महाराष्ट्राच्या राजकारणात जो कोणी उपमुख्यमंत्री झाला तो मुख्यमंत्री न झाल्याची उदाहरणं आहेत. उपमुख्यमंत्रिपदावर राहून मुख्यमंत्री होणारे देवेंद्र फडणवीस हे राज्यातील पहिलेच नेते ठरले



आहेत. आतापर्यंतच्या इतिहासात महाराष्ट्राला एकूण ११ उपमुख्यमंत्री लाभले. ज्यामध्ये २ वेळा छगन भुजबळ तर ५ वेळा अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रिपद भुषवलं. नाशिकराव तिरपडे, सुंदरराव सोळंखे, रामराव आदिक, गोपीनाथ मुंडे, छगन भुजबळ, विजयसिंह मोहिते, आर.आर पाटील, अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस हे उपमुख्यमंत्री राहिलेत. तर उपमुख्यमंत्रिपदानंतर मुख्यमंत्री होणारे फडणवीस हे पहिलेच नेते आहेत. १९७८ पासून महाराष्ट्रात हा समज होता की, उपमुख्यमंत्री झालेला व्यक्ती हा मुख्यमंत्री होत नाही. तो पायंडा फडणवीसांनी मोडला. तर वसंतराव नाईक यांच्यानंतर सलग पाच वर्षांची टर्म पूर्ण करणारे देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राचे दुसरे मुख्यमंत्री आहेत. देवेंद्र फडणवीस यांच्या राजकीय करिअरला तरूण वयातच सुरुवात झाली. अवघ्या २२ व्या वर्षी देवेंद्र फडणवीस हे नागपूर महापालिकेत नगरसेवक म्हणून निवडून आले. त्यानंतर सर्वात तरूण महापौर बनले. मग ते नागपूर दक्षिण पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे आमदार झाले. भाजपचं प्रदेशाध्यक्षपद देखील देवेंद्र फडणवीसयांना सांभाळलं आहे. २०१४ साली वयाच्या ४४ व्या वर्षी ते राज्याचे मुख्यमंत्री झाले. २०१९ ला अजित पवारांसोबत त्यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली मात्र अवघ्या काही तासात हे सरकार कोसळलं. आता आज देवेंद्र फडणवीस तिसऱ्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली.

# लाडक्या बहिणीचे आर्थिक ओझे पेलण्यासाठी योजनेला लागणार चाळणी?

## तर लाभासाठी नियम कठोर होणार : डिसेंबरच्या २१०० रुपये वाढीकडे लागले लक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

राज्य शासनाची सत्तास्थापना होताच लाडकी बहीण योजनेच्या निकषांमध्ये लक्षणीय बदल होण्याची शक्यता प्रशासनातून व्यक्त होत आहे. निवडणुकीपूर्वी महिला मतदारांचे मतदान डोळ्यांसमोर ठेवून योजना राबविली गेली. पण, आता आर्थिक ओझे पेलण्यासाठी या योजनेला चाळणी लावली जाण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

निवडणुकीपूर्वी योजना राबविताना निकषांची काटेकोर छाननी करण्यात आली नव्हती. एका कुटुंबात दोनच महिलांना लाभाचा निकष असतानाही त्यापेक्षा जास्त महिलांना लाभ देण्यात आला.

घरात चारचाकी वाहन, आयकर भरणारे यांनाही योजनेचा लाभ घेता येत नव्हता, तरीही अशा कुटुंबातील महिलांच्या खात्यांवर पैसे जमा झाले. लाभार्थी महिलांच्या नावांची यादी ग्रामपंचायतीत ग्रामसभेत जाहीर वाचन करून मान्यता देण्याचा नियम होता.तो देखील पाळला गेला नाही. ग्रामसभांत यादीचे वाचन झालेच नाही हे विशेष.आता नविन सरकार सत्तारूढ होताचयोजनेचे पोर्टल पुन्हा सुरू होऊन – त्यांच्या खात्यांवर पैसे जमा होण्याची शक्यता वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व्यक्त केली. दरम्यान, योजनेसाठी खर्च होणाऱ्या निधीचा मोठा बोजासरकारला पेलावा लागत आहे, है लक्षात घेऊन योजनेचे निकष अधिक काटेकोर केले जातील, असे सांगण्यात आले आहे.

महिलांना १५०० रुपयांवरून आता २१०० रुपये दिले जाणार आहेत, त्यामुळे हा बोजा आणखी वाढणार आहे. योजनेअंतर्गत आतापर्यंत पाच हप्ते देण्यात आले आहेत. जुलै ते नोव्हेंबर अशा पाच महिन्यांचे साडेसात हजार रुपये लाडक्या बहिणींना मिळाले.

मात्र, आचारसंहितेमुळे डिसेंबर महिन्याचे पैसे निवडणुकीनंतर देण्यात येणार असबुसाचे आश्वासन देण्यात आले होते. जेत्ता निकालानंतर लाडक्या बहिणींचे लक्ष मिळणाऱ्या हप्त्याकडे लागले आहेत.




### दुबार लाभ टाळण्याचा प्रयत्न; नव्याने नोंदणी होणार का ?

या लाभार्थ्यांमधून आयकर भरणारे, घरात चारचाकी वाहन असणारे वगळले जाण्याची शक्यता आहे. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अडीच लाखांपेक्षा जास्त असणारे कुटुंब योजनेसाठी पात्र नाही, तरीही त्यांना आतापर्यंत लाभ मिळाला आहे. याचीही छाणनी होण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली.

संजय गांधी निराधार किंवा अन्य शासकीय योजनांचा लाभ घेणाऱ्या महिलांनाही लाडकी बहीण योजनेचा दुबार लाभ मिळणार नाही, याची दक्षता घेतली जाणार आहे. लाडकी बहीण योजनेच्या काही लाभार्थी अद्यापही प्रतीक्षेत आहेत. त्यामुळे राज्य सरकारकडून आता नवीन २१०० रुपयांचा हप्ता दिला जाणार आहे. त्यामुळे प्रलंबित लाभार्थ्यांचा यावेळी शासन विचार करणार का, असा प्रश्न प्रतीक्षेत असणाऱ्या लाभार्थ्यांकडून उपस्थित केला जात आहे.

# निवडणूक आटोपली; पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या बैठका सुरूच; कुठे आघाडी-कुठे बिघाडीवरून रंगताहेत चर्चा: शेकोट्यांवर वातावरण गरम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

गेल्या महिनाभरापासून तापलेले वातावरण विधानसभा निवडणूक आटोपल्यावर शांत झालेले दिसून येत असले तरी पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या बैठका मात्र सुरूच असल्याचे दिसून येत आहे. कुठे आघाडी, कुठे बिघाडीवरून त्यांच्यामध्ये चर्चा रंगत असून, थंडीच्या वातावरणात शेकोट्यांवर वातावरण गरम होत असल्याचे दिसून येत आहे.



अमरावती विधानसभा मतदारसंघाच्या आठही मतदार संघातील निवडणूक आटोपली. विजयी उमेदवारांचा जल्लोष, मिरवणूक, स्वागत समारंभही पार पडले आहेत. परंतु, प्रमुख पक्षातील उमेदवारांमधील पदाधिकारी व कार्यकर्ते बूथनिहाय मतदारयादी हातात घेऊन कोणत्या गावात कोणाला किती मतदान झाले,याची पाहणी करीत आहेत. सोबत असलेल्या गावातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांना तुझ्या गावात पाहिजे त्या प्रमाणात मतदान न झाल्याचे सांगून कारणे विचारली जात आहेत. यावर काही जण संयुक्तिक, तर काहीजण मी तर प्रामाणिक काम केल्याचे पटवून सांगत आहेत. जेथे मताधिक्य वाढले तेथील पदाधिकारी, कार्यकर्ते मात्र आपली 'फिल्डिंग'च तशी लावून ठेवल्याची शेखी मिरवताना दिसून येत आहेत. विजयी उमेदवारांचे कार्यकर्ते केवळ कुठे कसे मतदान झाले, याची कारणे शोधण्यासाठी व पुढील नियोजनासाठी बूथनिहाय याद्या तपासणी करीत असले तरी पराजय झालेल्या उमेदवारांचे पदाधिकारी,कार्यकर्ते,समर्थक,नेमके आपण कुठे कमी पडलो याचा शोध घेतांना दिसून येत आहे.

### विजयी–पराजित उमेदवारांच्या कार्यकर्त्यांमध्ये रंगताहेत गप्पा

निवडणुकीमध्ये असलेल्या विजयी व पराभूत उमेदवारांमध्ये निवडणुका आटोपल्यानंतरही जोरदार गप्पा रंगतांना दिसून येत आहेत. कोणी प्रामाणिक काम केले, कोणी दिखावा केला, याबाबत आता उघडपणे बोलले जात आहे. निवडून आलेले व पराभूत झालेले उमेदवार मात्र याकडे दुर्लक्ष करताना दिसून येत आहेत. काही उमेदवार आपण सर्वांनी प्रामाणिक काम केले, याबाबत संशय नसून लोकांनी दिलेला कल मान्य करावा लागेल, असेही म्हणत आहेत.

### मताधिक्य घटलेल्या भागातील कार्यकर्ते खजील !

निवडणुकीत उमेदवारांसोबत राहून आपल्या भागात मताधिक्य मिळणार असल्याच्या बतावणी करणारे कार्यकर्ते बूथनिहाय यादी पाहिल्यानंतर मताधिक्य घटल्याने खजील झाल्याचे दिसून येत आहेत. यावर कोणी जोर देऊन विचारणा करीत नसले तरी त्यांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### प्रामाणिक काम केल्याचा केला जातोय दावा

ज्या भागात आपल्या उमेदवारांना मताधिक्य मिळेल, अशी अपेक्षा होती तेथेच मतदान घटल्याने त्या गावातील, सर्कलमधील पदाधिकारी, कार्यकर्ते आपण प्रामाणिक काम केल्याचा दावा करताना दिसून येत आहेत. यावर उमेदवारांचे समर्थक झाले गेले सोडा म्हणून पडदा टाकताना दिसून येत आहेत.

# अजित पवारांनी घेतली सहाव्यांदा उपमुख्यमंत्री पदाची शपथ: मुख्यमंत्री पदाची मात्र हुलकावणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५मुंबई**

आज महायुती सरकारच्या मंत्रिमंडळाचा ग्रैंड शपथविधी सोहळा नुकताच पार पड़ला या सोहळ्यात देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तर अजित पवार, एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख अजित पवार यांनी तब्बल सहाव्यांदा उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली मात्र अजित पवारांना महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदानं आजपर्यंत हुलकावणी दिली आहे.उल्लेखनीय बाब म्हणजे अजित पवारांनी पहिल्यांदा २०१० मध्ये काँग्रेसचे तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्याबरोबर उपमुख्यमंत्री पद भूषवलं. त्यानंतर राजीनामा दिल्यानंतर पुन्हा पृथ्वीराज चव्हाण यांच्याबरोबर त्यांनी उपमुख्यमंत्री म्हणून दुसऱ्यांदा काम पाहिलं. २०१४ ते २०१९ या कालावधीत राज्यात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपाचं सरकार सत्तेत होतं. त्यानंतर २०१९ मध्ये भाजपाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत त्यांनी 'बहुचर्चित' पहाटे



उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. मात्र, त्यांचं हे उपमुख्यमंत्री पद औट घटकेचंच ठरलं. त्यानंतर राज्यात २०१९ मध्ये शिवसेनेच्या उद्धव ठाकरे यांचं महाविकास आघाडीचं सरकार सत्तेत आलं. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना अजित पवार यांनी पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेसकडून उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली होती.

# जिल्ह्यातील शाळांना शिक्षण संचालक देणार अचानक भेट राज्यस्तरीय अधिकाऱ्यांकडून साक्षरता वर्गाची होणार पाहणी




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

राज्यस्तरावरून साक्षरता वर्गाची पाहणी करण्यासाठी शिक्षण संचालनालयातील अधिकारी हे क्षेत्रीय कार्यालय, जिल्हा, तालुका आणि निवडक शाळांना डिसेंबर महिन्यात भेटी देऊन आढावा घेणार आहेत. याबाबत योजना शिक्षण संचालकांनी आदेश निर्गमित केले आहेत. त्या अनुषंगाने कार्यक्रमाची आखणी व अंमलबजावणीसाठी ऑनलाइन पद्धतीने बैठका घेतल्या जात आहे. या बैठकांमधून दिलेल्या निर्देशानुसार जिल्हा, तालुका व शाळा स्तरावरील झालेल्या कार्यवाहीचा आढावा घेतला जाणार आहे.

केंद्र पुरस्कृत उल्लास नव-भारत साक्षरता कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबतच्या मार्गदर्शकसूचनांनुसार जिल्हा, तालुका व शाळा स्तरावर केलेल्या पूर्वतयारीचा, उल्लास मेळावा पूर्वतयारी व कार्यवाहीचा, तसेच शासनाच्या विविध योजनांचा आढावा घेण्यासाठी योजना संचालनालयातील अधिकारी जिल्ह्यातील तालुका कार्यालयांना आणि निवडक शाळांना भेटी देणार आहेत. भेटीदरम्यान संबंधित अधिकारी (योजना) कार्यालय, गटाशक्षणाधिकारा कायालय, शाळा तसेच उल्लास नव भारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत सुरू असलेल्या वर्गांना भेटी देऊन असाक्षर व स्वयंसेवक यांच्याशी चर्चा करणार आहेत. तसेच शाळांमधून विविध शासकीय योजनांची सुरू असलेल्या अंमलबजावणीची पाहणी करून त्याची माहिती घेणार आहेत.

विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी संचालनालय स्तरावरून भेटी देण्यासाठी येणाऱ्या अधिकाऱ्यांसोबत जिल्हा कार्यालयातील वर्ग-१ किंवा वर्ग-२ दर्जाचे अधिकारी दौऱ्यात पूर्णवेळ उपलब्ध असणार आहेत, असे आदेशात नमूद केले आहे. शिक्षण सहसंचालक राजेश क्षीरसागर यांनी मंगळवारी राज्यातील सर्व विभागातील संचालक ते केंद्रप्रमुख या सर्व क्षेत्रीय स्तरावरील उल्लास कार्यक्रमाचा आढावा घेतला.प्रशिक्षण संचालकांसह राज्यस्तरीय अधिकाऱ्यांकडून होणाऱ्या या कृतीमुळे जिल्हा तालुकास्तरीय यंत्रणा सतर्क झाल्या आहेत.

**प्रत्येक स्तरावर देण्यात आलेले नोंदणीचे उद्दिष्ट**

असाक्षर आणि स्वयंसेवक जोडणी, साक्षरता वर्गाची अध्ययन-अध्यापनविषयक स्थिती, स्वयंसेवकांचे प्रशिक्षण, मागील वर्षीचे अपूर्ण कामकाज, जिल्हा व तालुका स्तरावरील समित्यांच्या बैठका, उल्लास कार्यक्रमाच्या प्रचार प्रसारसाठी सार्वजनिक उत्सवातून व अन्यप्रकारे केलेले प्रयत्न, येत्या फेब्रुवारी महिन्यात होणाऱ्या परीक्षेची पूर्वतयारी, समाजातील अधिकाधिक घटकांचा या योजनेच्या यशस्वितेसाठी मिळणारा सक्रिय सहभाग असा विविध पैलूंचा यानिमित्ताने आढावा घेतला जाणार आहे. यामुळे साक्षरता वर्ग चालवणाऱ्यांची धाकधुक वाढली आहे.


# ७ डिसेंबरला गुरू येणार पृथ्वीच्या सर्वांत जवळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

सूर्यमालेतील सर्वांत मोठा ग्रह गुरू हा सूर्याशी प्रतियुतीत येत असून येत्या ७ डिसेंबरला तो पृथ्वीच्या सर्वांत जवळ पाहायला मिळणार आहे, अशी माहिती येथील खगोल अभ्यासकांनी दिली आहे.गुरू हा ग्रह ७ डिसेंबरला अगदी सूर्यासमोर येत आहे. या घटनेला खगोलशास्त्रात 'प्रतियुती' म्हणतात. या दिवशी सूर्य व गुरू आमने-सामने राहतील. प्रतियुतीच्या काळात गुरूचे पृथ्वीपासूनचे अंतर कमी असते. त्यामुळे खगोल अभ्यासकांना गुरूचे निरीक्षण करण्याची ही संधी आहे. लागोपाठ प्रतियुतीमधील काळ हा साधारण १३ महिन्यांचा असतो. यापूर्वी ३ नोव्हेंबर २०२३ रोजी गुरू-सूर्य प्रतियुती झाली होती.

पृथ्वीपासून गुरूचे अंतर ९३ कोटी किमी व व्यास १,४२,८०० किमी आहे. या ग्रहाला सूर्याभोवती एक प्रदक्षिणा मारण्यास ११.८६ वर्षे लागतात. गुरू हा ग्रह अत्यंत तेजस्वी दिसत असल्याने तो सहज ओळखता येईल व साध्या डोळ्याने पाहता येणार आहे. ग्रेट रेड स्पॉट, युरोपा, गॅनिमीड, आयोव कॅलेस्टो हे गुरूचे चार चंद्र मात्र साध्या डोळ्याने दिसू शकणार नाही.

यासाठी टेलिस्कोपची आवश्यकता असल्याची माहिती मराठी विज्ञान परिषद अमरावती विभागाचे अध्यक्ष प्रवीण गुल्हाने व हौशी खगोल अभ्यासक विजय गिरुळकर यांनी दिली. गुरूला एकूण ७९ चंद्र आहेत.



टेलिस्कोपमधून गुरूचे निरीक्षण केले असता गुरूवरचा पट्टा व चार चंद्र दिसतात. ७ डिसेंबर १९९५ रोजी मानवविरहित यान 'गॅलिलिओ' गुरूवर पोहोचले. गुरूवर जीवसृष्टी असल्याचा कोणताही पुरावा अजूनपर्यंत मिळालेला नाही.

पृथ्वीपेक्षा गुरू हा ११.२५ पट मोठा आहे. रक्तरंगी ठिपका हे गुरूचे खास वैशिष्ट्य, 'ग्रेट रेड स्पॉट' या नावाने हा ठिपका ओळखला जातो. ४० हजार किमी लांब १४ हजार किमी रुंदीचा हा अवाढव्य ठिपका आहे. या ठिपक्याचे निरीक्षण केले असता ते एक प्रचंड चक्रीवादळ असल्याचे सहज लक्षात येईल. गुरूवर घोंघावणारे चक्रीवादळ एका विशिष्ट ठिकाणीच का निर्माण झाले, याचे कारण मात्र अजूनही अज्ञात असल्याचे गिरूळकर यांनी सांगितले.गेल्या वर्षी ३ नोव्हेंबर रोजी गुरू हा ग्रह सूर्याशी प्रतियुतीत आला होता. सध्या गुरू ग्रह अत्यंत तेजस्वी दिसत असून, येत्या काही दिवसांपर्यंत तो असाच राहणार आहे. हा ग्रह शनिवारी रात्री आकाशात आपले लक्ष केंद्रित करणार आहे.

# देवेंद्र फडणवीसांनी शपथ घेतली, आमदार तुळजापूरला पायी जाणार, नवस फेडणार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५मुंबई**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस आज तिसऱ्यांदा शपथ घेत आहेत. त्यामुळे, गेल्या ५ वर्षांपासून भाजप नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि आमदार, खासदार ज्या क्षणाची वाट पाहत होते, ज्या दिवसाकडे डोळे लावून बसले होते, अखेर तो क्षण आला, तो दिवस उजाडला. त्यामुळे, भाजपच्या सर्वांनाच आनंद झाला आहे. औसा मतदारसंघातील भाजपचे आमदार आणि देवेंद्र फडणवीस यांचे सहकारी असलेल्या अभिमन्यू पवार यांनी या क्षणाची वाट पाहिली होती, देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री व्हावेत, असा नवस देखील महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेला केला होता. त्यानुसार, इच्छापूर्ती झाल्याने आता आमदार अभिमन्यू पवार आपला नवस फेडणार आहेत. औसा ते तुळजापूर असा पायी प्रवास करत ते देवीच्या दर्शनाला जाणार असल्याचे त्यांनी सांगितलं.

भाजप कार्यकर्त्यांच्या दृष्टीने आज सोनियाचा दिन आहे. या दिवसाची प्रतीक्षा आम्ही पाच वर्षांपासून करत होतो. देवेंद्र फडणवीस यांचे सहकारी म्हणून मी २५ वर्ष काम केले, या काळात नेता, मुख्यमंत्री, विरोधी पक्षनेता अशा सगळ्या रोलमध्ये देवेंद्र फडणीस यांनामी बघितलं आहे. देवेंद्र फडणवीस अस्सल २४ कॅरेट सोनं आहे, किती संयम त्यांनी ठेवावा, किती सहन करावं. जे टोमणे, ज्या शिव्या देवेंद्र फडणीस यांनी मागील पाच वर्षात खाल्ल्या, त्यातून निघालेले हे मंथन आहे, अशा शब्दात अभिमन्यू पवार यांनी आजच्या दिवसाचं वर्णन केलं आहे. मी तुळजापूरच्या देवीला नवस केला होता. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होऊ दे... आता तो नवस पूर्ण झाला आहे, आणि तो नवस फेडण्यासाठी मी औसा ते तुळजापूर चालत जाणार आहे, असेही पवार यांनी सांगितले.